मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

बुधवार दि. २६ नोव्हेंबर १९९७ रोजी झालेल्या ४९ व्या बैठकीचा

कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ४९ वी बैठक बुधवार दि. २६ नोव्हें. १९९७ रोजी दुपारी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

१]	ॲडव्होकेट श्री मधु चव्हाण,	सभापती.
२]	श्री एम. डी. अप्पलवार,	मुख्य अधिकारी.
३]	,, वि. म. कोकणे,	उपसचिव, महाराष्ट्र शासन.
४]	,, अरविंद रेळे,	सदस्य.
५]	,, विनोद खोपकर	,,
६]	,, चंद्रकांत विश्वासराव,	,,
७]	,, अमोद उसपकर,	,,
८]	,, भालचंद्र ठाकूर,	,,
९]	,, दगडू सकपाळ,	,,
१०]	,, देवदास साटम,	,,
११]	प्र, प्रकाश भूवड,	,,
१२]	,, दिलीप गोडांबे,	,,
१३]	,, गणेश तिकोने,	,,
१४]	डॉ. विनोद मेहता,	,,
१५]	श्री अभय सावरकर,	,,
१६]	,, अनंत पालकर,	,,
१७]	,, दाजी [गोपाळ] मोडक,	,,
१८]	प्रमुख अभियंता, म. न. पा. यांचे प्रतिनिधी,	निमंत्रक.
१९]	उपकर निर्धारक व संकलक [शहरे], म. न. पा.	,,

मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे व अधिकाऱ्यांचे स्वागत करून माहिती दिली की, श्री गद्रे, नि. का. अ. /सचिव हे निवृत्त झाल्यानंतर या पदाचा कार्यभार श्री टी. डी. सावंत, उपअभियंता यांना सांभाळण्यास सांगण्यात आले आहे व आजच्या बैठकीचे श्री सावंत हे सचिव म्हणून काम पहाणार आहेत असे सांगून मा. सभापती यांनी सर्व सन्मा. सदस्य

व अधिका-यांच्यावतीने त्यांचे अभिनंदन करून बैठकीच्या कामकाजाला सुरवात करण्याच्या सचिवांना सूचना दिल्या.

श्री सावंत, सचिव यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिका-यांचे स्वागत करून बैठकीच्या कामकाजास सुरवात केली.

बाब क्रमांक : ४९/१.

विषय- मुं. इ. दु. व. पु. मंडळाच्या दि. १५. १०. ९७ रोजी संपन्न झालेल्या ४८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मुं. इ. दु. व. पु. मंडळाचा ४८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत पृ. क्र. १ ते ११३ वर सर्व सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी व स्थायी करण्यासाठी सादर करण्यात आला आहे.

यावर चर्चा करताना उप सचिव श्री कोकणे यांनी पृ. क्र. ११ वर " प्राधिकरणाने फंड उपलब्ध करून देण्यास मंजूरी दिलेली आहे" असे जे वाक्य आहे त्याऐवजी " प्राधिकरणाने फंड उपलब्ध करून देण्यासापेक्ष " अशी वाक्यरचना करण्यात यावी असे सुचविले.

मा. सभापती यांनी श्री कोकणे यांनी सुचविलेली दुरूस्तीची नोंद घेऊन कार्यवृत्तांत घेण्यात यावी अशा सूचना दिल्या व ४८ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

बाब क्रमांक : ४९/२. [पुनर्बांधणी विभाग]

विषय- इ. क्र. २३३-ब, वाळकेश्वर रोड, शिवस्मृती, डी. विभाग या पुनर्रचित इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्तीच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृ. क्र. ११५ ते १२३ वर सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, मागील बैठकीत सदर विषय चर्चेला आला असताना सन्मा. सदस्यांनी सदर इमारतीची पहाणी

करण्याबाबत सुचविले होते. त्याप्रमाणे मा. सदस्य श्री भूवड व श्री उसपकर यांनी सदर इमारतीची पहाणी केली असून प्रशासनाचा निर्णय बरोबर आहे हे दिसून आल्यामुळे सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे मत व्यक्त केले की, सदर इमारत दुरूस्तीसाठी घ्यावी याबद्दल आमचे दुमत नाही. परंतु जे दर ठरविण्यात आले आहेत त्या दरांशी ते असहमत आहेत. कारण एखादे विशिष्ट प्रॉडक्ट डोळयासमोर ठेऊन सदर दर निश्चित करण्यात आले आहेत. दुस-या कोणत्याही प्रॉडक्टचा स्पर्धेसाठी विचार केलेला नाही.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, या विषयाबाबत मागील बैठकीत चर्चा झाली होती व त्यावेळी असे ठरले होते की, अधिका-यांनी या प्रॉडक्टची पहाणी करून घ्यावी.

यावर मा. सदस्य श्री गोडांबे यांनी असे मत मांडले की, अधिका-यांनी पहाणी करून अहवाल दिलेला असल्यामुळे चर्चेची गरज वाटत नाही. यावर मा. सदस्य श्री उसपकर यांनी सदर प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही परंतु दरांबाबत ते सहमत नाहीत असे मत व्यक्त केले.

श्री परब, उ. मु अभि. यांनी माहिती दिली की, सुनंदा केमिकल्स यांचे प्रॉडक्ट जागतिक दर्जाचे असून सेंटॉर हॉटेल, एअर इंडिया, वांद्रे-कुर्ला संकुल येथील डायमंड मार्केट इत्यादी ठिकाणी वापरण्यात आले आहे. मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, मा. सदस्यांनी केलेल्या पहाणीमध्ये ज्या त्रुटी आढळून आल्या तेवढया पुरतीच चर्चा करण्यात यावी. तर मा. सभापती यांनी सुनंदा केमिकल्स ही कंपनी कशी गैर आहे हे दाखवून दुस-या कोणत्या एजन्सीस सदर काम देता आले असते याबाबत मा. सदस्य श्री उसपकर यांनी मुद्दे मांडावेत अशी सूचना केली.

यावर मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, बाजारात आणखी तीन प्रॉडक्ट उपलब्ध असून तीही जागतिक दर्जाची आहेत. त्या प्रॉडक्टची कागदपत्रे पहाण्यासाठी त्यांनी ती मुख्य अधिकारी व मा. सभापती यांच्याकडे सादर केली. सदर प्रॉडक्टचे दर आपण प्रस्तावित केलेल्या पॉलीमर या प्रॉडक्टपेक्षा ३० ते ४० टक्क्यांनी कमी आहेत.

श्री परब, उ. मु. अभि. यांनी माहिती दिली की, हे विशिष्ट प्रॉडक्ट वापरण्यामागे इमारतीची अवस्था अतिशय धोकादायक होती म्हणून जास्तीतजास्त चांगल्या गुणवत्तेचे प्रॉडक्ट वापरणे हा उद्देश होता व सदर काम हे निविदा मागवूनच करण्यात येणार आहे.

....४/-

मुख्य अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, मा. सदस्य श्री उसपकर यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यामागील त्यांची भावना समजून घेण्यात यावी. एखाद्या विशिष्ट कंपनीच्या प्रॉडक्टचा गुणवत्तेचा विचार न करताच अंदाजपत्रक तयार करणे योग्य नाही, हे मा. सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. त्यांनी दिलेल्या तिन्ही प्रॉडक्टच्या गुणवत्तेची पहाणी करुन चांगल्या गुणवत्तेचे व कमी दर असलेल्या प्रॉडक्टचा विचार करण्यास हरकत नाही. या मताशी सर्व सन्मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणाले की, या विषयाबाबत मागील बैठकीत सविस्तर चर्चा होऊन मा. सदस्यांनी पहाणी करुन अहवाल सादर करण्याच्या अटीवर सदर बाब पुढे ढकलण्यात आली होती व आता मा. सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे त्यांनी त्यांच्या अहवालात नमूद करावयास हवे होते म्हणजे आजच्या बैठकीत सर्व सदस्यांनी अहवालातील चौकशीच्या मुद्दयांबाबत श्री परब यांच्याकडून खुलासा मागविला आला असता. बाजारात तीन प्रॉडक्ट उपलब्ध असताना एकाच प्रॉडक्टचा विचार का करण्यात आला? याबाबत त्यांच्याकडे विचारणा करता आली असती. यावर मा. सदस्य श्री उसपकर यांनी माहिती दिली की, मागील बैठकीच्या वेळी त्यांनी तीन/चार प्रॉडक्टची माहिती देण्यात यावी म्हणजे कोणते प्रॉडक्ट निवडावयाचे ते ठरविता येईल असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला होता.

उप सचिव श्री कोकणे यांनी असे मत व्यक्त केले की, मंडळाचे सन्मा. सदस्य जेव्हा पहाणी करुन अहवाल सादर करतात तेव्हा अहवालाची प्रत माहीतीसाठी सर्वांना बैठकीपूर्वी देण्यात यावी म्हणजे अहवालातील मुद्दयांबाबत सर्व सन्मा. सदस्यांना माहिती मिळू शकेल. मागील बैठकीत सदर प्रॉडक्ट हे पेटंट टेक्निक असल्याचे निदर्शनास आणण्यात आले होते आणि जर ते पेटंट असेल तर, बाजारात त्यासारखीच दुसरी प्रॉडक्ट जरी उपलब्ध असली आणि त्यांचे स्वत:चे पेटंट असले तरी एखादे पेटंट निवडल्यानंतर दुसरे पेटंट वापरता येत नाही.

मुख्य अधिकारी यांनी मा. सदस्य श्री उसपकर यांनी निदर्शनास आणलेल्या तिन्ही प्रॉडक्टच्या गुणवत्तेचा व दरांचा विचार करुन योग्य ते प्रॉडक्ट स्विकारण्यात येईल असे मत व्यक्त केले असता श्री परब उ. मु. अभि. यांनी असे निदर्शनास आणाले की, तसे करावयाचे झाल्यास प्रत्येक प्रॉडक्टचे अंदाजपत्रक वेगळे बनवावे लागेल.

यावर मुख्य अधिकारी यांनी ~~असे~~ सांगितले की, मुख्य अधिकारी यांनी त्यांना दिलेली सूचना ही धोरणात्मक निर्णय म्हणून

दिलेली आहे. त्यामुळे तिन्ही प्रॉडक्टच्या गुणवत्तेचीचाचणी घेतल्यानंतर कमी दराच्या प्रॉडक्टची निवड करण्यात यावी.

मा. सदस्य श्री दगडु सकपाळ यांनी सदर प्रश्नाबाबत विचारलेल्या प्रश्नास अनुसरून मा. सभापती यांनी माहिती दिली की, ज्यावेळी गणेश भुवन पडली त्यावेळी अन्य पुनर्रचित इमारतींचीसुध्दा पहाणी करण्यात आली. त्या पहाणीमध्ये २/३ इमारतींची तातडीने दुरूस्ती करण्याची आवश्यकता असल्याचे दिसून आले. त्यानुसार सदर बाब आजच्या बैठकीत ठेवण्यात आली आहे व आज जे मुद्दे उपस्थित करण्यात आले ते मागील बैठकीत उपस्थित करण्यात आले नव्हते. त्यावेळी दुरूस्तीसाठी जो खर्च अपेक्षित होता तो पुनर्रचनेसाठी लागणा-या खर्चाच्या जवळपास होता म्हणून तेवढ्या खर्चात पुनर्रचना करता येणे शक्य आहे का? म्हणून त्या इमारतीची पहाणी करण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे मा. सदस्य श्री उसपकर व श्री भूखड यांनी पहाणी करून त्यांनी अहवालात सदर इमारतीची दुरूस्ती करण्याच्या मंडळाच्या निर्णयाबाबत त्यांचे समाधान झाले आहे असे नमूद केले आहे. परंतु त्यांनी प्रॉडक्टच्या गुणवत्तेबाबत मात्र काही मुद्दा नमूद केलेला नाही.

यावर श्री परब, उ. मु. अभि. यांनी माहिती दिली की, सदर कामाच्या निविदा मागविताना इतर प्रॉडक्टचा आपण विचार करू शकतो. तर श्री वणीकर, उ. मु. अभि. यांनी असे निदर्शनास आणले की, सदर प्रस्ताव हा केवळ प्रशासकीय मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे. त्यामुळे सदर प्रस्तावास मान्यता देताना मा. सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे गृहीत धरून कोटेशन्स मागवावीत.

मुख्य अधिकारी यांनी निदर्शनास आणले की, कोठलेही अंदाजपत्रक तयार करताना डी. एस. आर. विचारात घेतला जातो. डी. एस. आर. मध्ये या मटेरियलचा उल्लेख असेल तर त्याप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यास हरकत नाही तसेच मा. सदस्यांनी निदर्शनास आणलेल्या प्रॉडक्टच्या गुणवत्तेबाबत चाचणी घेण्यात यावी, त्यांचा एकंदर दर्जा कसा आहे हे विचारात घ्यावे व जे प्रॉडक्ट तांत्रिकदृष्टया उच्च दर्जाचे असेल अशा प्रॉडक्टच्या किंमतीची तुलना करण्यात यावी. उदा. तिन्ही प्रॉडक्टचा दर्जा सारखाच असेल तर त्यांच्या पैकी कमी दराचे प्रॉडक्ट स्विकारावे व त्याप्रमाणे अंदाजपत्रकात दुरूस्ती करून घ्यावी. ५ ते १० टक्क्यापर्यंतचे अधिकार संबंधित अधिका-यांना असल्यामुळे सदर अंदाजपत्रक मंडळासमोर पुन्हा आणण्याची आवश्यकता नाही. तूर्त तिन्ही प्रॉडक्टबाबतचा अहवाल तज्ञांकडून १५ दिवसांत मिळवावा तोपर्यंत प्रशासकीय मंजूरी देऊन कामास सुरवात करण्यास हरकत नाही.

मा. सभापती यांनी सर्वानुमते असा निर्णय घेतला की, मा. सदस्य श्री उसपकर यांनी मांडलेल्या सूचना लक्षात घेऊन सदर प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे व मुख्य अधिकारी व मा. सदस्य श्री सकपाळ यांनी मत व्यक्त केल्याप्रमाणे एखाद्या प्रॉडक्टचा दर कमी असेल परंतु गुणवत्ता चांगली नसेल तर मग तुलनात्मक भाव पाहून निर्णय घ्यावा. यावर मा. सदस्य श्री उसपकर दर हा दुरूस्तीच्या डी. एस. आर. प्रमाणे असावा पुनर्रचनेच्या डी. एस. आर. प्रमाणे नसावा असे मत व्यक्त करून असे निदर्शनास आणले की, इमारतीची दुरूस्ती केली जाते तेव्हा रू. ७५०/- प्रति चौ. मी. ही मर्यादा ठेवतो. परंतु या प्रकरणी मात्र ती मर्यादा रू. ३०००/- प्रति चौ. मी. ठरविण्यात आली आहे हे योग्य नाही. त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा. मा. सदस्यांच्या या मताशी सहमती दर्शवून मा. सभापती यांनी निकष ठरविण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन करून सर्वानुमते सदर प्रस्तावांना मान्यता देण्याचे ठरले.

[क] विषय- इ. क्र. १८-अे, १८-ब, सहकार भुवन,
डॉ. बी. ए. रोड, परळ, मुंबई येथील
पुनर्रचित इमारतीच्या नावाच्या
प्रस्तावास मान्यता देमिळणेबाबत.

उपरोल्लेखित प्रस्ताव पृ. क्र. १३१ वर सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन इ. क्र. १८-अे, १८-ब, सहकार भूवन या पुनर्रचित इमारतीस "सहकार भूवन" हे नांव देण्यास सर्वानुमते सविस्तर चर्चेअंती मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ४९/३८२

पुनर्बांधणी विभागातील खालील प्रस्तावांवर प्रदीर्घ चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, मा. सदस्यांनी निदर्शनास आणलेल्या तिन्ही प्रॉडक्टच्या गुणवत्तेची चाचणी घेऊन जे प्रॉडक्ट तांत्रिकदृष्टया उच्च दर्जाचे असेल त्याच्या दराची तुलना करण्यात यावी किंवा तिन्ही प्रॉडक्टचा दर्जा सारखा असेल तर त्यामधून कमी दराचे प्रॉडक्ट स्विकारावे. तोपर्यंत प्रशासकीय मंजूरी देऊन कामास सुरवात करण्यास हरकत नाही असा सर्वानुमते निर्णय घेऊन खालील प्रस्तावांना मान्यता देण्यात आली.

[अ] इ. क्र. २३३-ब, वाळकेश्वर रोड, शिवस्मृती, डी. विभाग हया पुनर्रचित इमारतीची संरचनात्मक दुरूस्ती.

[ब] इ. क्र. १०-१२, रोघा लेन, सी. विभाग या पुनर्रचित इमारतीची संरचनात्मक दुरूस्ती.

[क] १८-अे-बी, सहकार भूवन, डॉ. बी. ए. रोड, परळ, मुंबई हया पुनर्रचित इमारतीस " सहकार भवन" हे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ४९.३

विषय- संक्रमण शिबीरातील दि. ३१.१०.९७ पर्यंत
रिक्त/घुसखोर गाळयांची माहिती
दर्शविणारा तक्ता.

संक्रमण शिबीरातील घुसखोरी/रिक्त गाळयांची माहिती दर्शविणारा तक्ता सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी पृ. क्र. १३३ वर सादर करण्यात आला आहे.

सदर बाबत चर्चा करताना मा. सदस्य श्री सावंत यांनी निदर्शनास आणाले की, पृ. क्र. १३३ वर घुसखोर ६४४ दाखविण्यात आलेले आहेत ते चुकीचे असून ते कोणत्या संक्रमण शिबीरातील घुसखोर आहेत हेही दाखविलेले नाही.

मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणाले की, मालवणी संक्रमण शिबीरात घुसखोर नाहीत असे म्हटलेले आहे. खरेतर तेथील घुसखोरांना स्थगिती दिलेली आहे.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी घुसखोरांची संख्या आहे तितकीच दाखविण्यात आलेली आहे त्यावरून काही प्रगती झाल्याचे दिसून येत नाही. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, प्रगती अशासाठी दिसून येत नाही की, न्यायालयाने ज्या घुसखोरांना बाहेर काढण्याचा निर्णय दिला होता त्या घुसखोरांना पावसाळ्यापर्यंत स्थगिती देण्यात आली होती व त्या घुसखोरांना १ ऑक्टो. १९९७ रोजी बाहेर काढू असे स्वतः [illegible] लोकप्रतिनिधींनी आश्वासन दिले होते व स्थगिती दिली होती व त्यांचा मान राखण्यासाठी मा. मंत्री महोदय यांनी दहिसर येथील हॅपीहोम व टागोर नगर, विक्रोळी येथील घुसखोरांना १ ऑक्टो. ९७ पर्यंत बाहेर काढू नये असे तोंडी आदेश दिले होते. परंतु इतर ठिकाणच्या घुसखोरांना सदर

स्थगिती लागू नाही.

९५

बाब क्रमांक : ४९. ४ [उपमुख्य अधिकारी/पु. गा.]

विषय- पुनर्रचित इमारतीतील घुसखोरांनी व्यापलेल्या गाळ्यांचे न्यायाधीन/सक्षम प्राधिकारी/अपिल अधिकारी यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा दि. ३१. १०. ९७ रोजीपर्यंतचा गोषवारा.

उपरोल्लेखित माहिती पृ. क्र. १३५ वर सादर करण्यात आली आहे.

मा. सदस्य श्री गोडांबे यांनी असे निदर्शनास आणले की, शिवम या पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांत घुसखोरी करुन बराच कालावधी एक घुसखोर रहात आहे. न्यायाधिकरणाच्या नांवाखाली प्रकरण कधी संपत नाही व घुसखोराला बाहेरही काढले जात नाही. माहीम येथील शिवम या पुनर्रचित इमारतीतील घुसखोर बराच काळ वास्तव्य करुन आहेत.

मा. सभापती यांनी विचारणा केली की, कालिकादर्शन या पुनर्रचित इमारतीतील १३ घुसखोरांना बाहेर काढले का? त्यांनी पुढे माहिती दिली की, कालिकादर्शन या इमारतीतील घुसखोरांबाबत उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, मंडळाचे मुख्य अधिकारी जो निर्णय देतील तो ग्राह्य धरावा. त्याप्रमाणे पूर्वीचे मुख्य अधिकारी श्री अशोक लाल यांनी या घुसखोरांना कोठल्याही प्रकारची स्थगिती दिलेली नाही. यावर विधी शाखेतर्फे श्री बिर्जे, स. वि. स. यांनी माहिती दिली की, उच्च न्यायालयाचा असा निर्णय झाला आहे की, जे निव्वळ घुसखोर आहेत त्यांना त्वरित बाहेर काढण्यात यावे व खालचे कोणतेही न्यायालय त्या घुसखोरांना स्थगिती देऊ शकत नाही. सक्षम प्राधिकारी यांनीही ७ दिवसांत त्या घुसखोरांना बाहेर काढण्यात यावे असा निर्णय दिलेला आहे.

यावर उप सचिव श्री कोकणे यांनी असे मत व्यक्त केले की, मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय जर मंडळाने अंमलात आणला तर सगळ्याच घुसखोरांना एका रात्रीत बाहेर काढू शकतो व घुसखोरांना न्यायालयाचे संरक्षण नाही. त्यामुळे त्यांची प्रकरणे सक्षम प्राधिकारी/अपिल अधिकारी यांच्याकडे जाण्याची गरज नाही.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, कालिकादर्शन या इमारतीमधील घुसखोर पुन्हा न्यायालयात गेले होते व न्यायालयाने त्यांना संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क करण्यास सांगितले व त्या अधिकाऱ्यांनी जर

नकार दिला तर न्यायालयाकडे यावे असा निर्णय दिला.

यावर स.वि.स./प्राधिकरण यांनी माहिती दिली की, सक्षम प्राधिकारी यांनी घुसखोरांना ७ दिवसांत बाहेर काढावे असा निर्णय दिला आहे. घुसखोरांनी अपिल अधिकारी यांजकडे अपिल दाखल केले आहे. परंतु अपिल अधिकारी नसल्यामुळे त्यांचे अपील प्रलंबित आहे.

मा.सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीत अशा सूचना देण्यात आल्या होत्या की, माहिती सादर करताना इमारतीचे नांव दाखविताना ती कोणत्या विभागात आहे त्या विभागाचे नांवही दाखविण्यात यावे. या सूचनांचे पालन करण्यात आलेले नाही.

मा.सदस्य श्री सावरकर यांनी विचारणा केली की, न्यायालयाचा निर्णय संबंधित कार्यालयाने विधी सल्लागार/प्रा. यांच्याकडून मिळवावयाचा कि विधी सल्लागार/प्रा. यांनी तो निर्णय संबंधित कार्यालयांस द्यावयाचा? यावर न्यायालयाचा निर्णय विधी सल्लागार/प्रा. यांनी संबंधित विभागांस कळविला पाहिजे अशी पध्दत असल्याचे सांगून माहिती दिली की, उच्च न्यायालयाचा निर्णय कळवून घुसखोरांची प्रकरणे अपिल अधिकारी/सक्षम प्राधिकारी यांच्याकडे जाण्याची गरज नाही. फक्त अनधिकृत भाडेकरूंची प्रकरणेच त्यांच्याकडे पाठवावयास हरकत नाहीत असे कळविण्यात आले. आहे. तसेच कालीकादर्शन मधील काही घुसखोरांना बाहेर काढण्यात आले असून काही घुसखोरांची प्रकरणे शासनाकडे प्रलंबित आहेत.

मा.सदस्य श्री गोडांबे यांनी निदर्शनास आणले की, शिवम हया पुनर्रचित इमारतीतील घुसखोरांना मंडळाच्या अधिकाऱ्यांचे सहाय्य मिळत असून पोलीस देखील भाडेकरूंचे म्हणणे ऐकून घेत नाहीत. सध्या सदर प्रकरणी न्यायालयाची स्थगिती असून आणखी किती वर्षे सदर स्थगिती चालू रहाणार. मंडळाचे अधिकारी व वकील याबाबत काय कार्यवाही करत आहेत ?

यावर मा.सभापती यांनी माहिती दिली की, घुसखोरांमध्ये दोन भाग आहेत. सन १९८४-८६ या कालावधीत ज्या लोकांची फसवणूक झालेली आहे ते लोक पुनर्रचित इमारतीत रहात आहेत. परंतु जे निव्वळ घुसखोर आहेत त्यांना न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे व प्रशासकीय व्यवस्थे-प्रमाणे कायद्यात कोठेही संरक्षण नाही. त्यांना बाहेर काढावे लागेल. मा.मंत्री श्री डाके व श्री जैन आणि इतर लोकप्रतिनिधी यांची एक बैठक झाली होती त्यावेळी जे लोक फसले गेले आहेत त्यांना शासनाने संरक्षण दिले पाहीजे अशी मागणी केली. याबाबत मुख्य अधिकारी यांना टिपणी सादर करण्यास सांगण्यात आले आहे. त्याप्रमाणे सविस्तर टिपणी मुख्य अधिकारी

यांनी मा. मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सादर केलेली आहे व या प्रकरणी लौकरच निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन मा. मुख्य मंत्री यांनी दिले आहे.

चर्चा चालू असताना विधी सल्लागार श्री वाचासुंदर बैठकीस उपस्थित झाल्यानंतर मा. सभापती यांनी त्यांना विचारणा केली की, मा. न्यायमूर्ती श्री धनुका यांनी घुसखोरांना कोठल्याहीप्रकारचे संरक्षण नाही असा जो निर्णय दिला तो निर्णय लक्षात घेऊन सक्षम प्राधिकारी/अपिल अधिकारी यांच्याकडे घुसखोरांची प्रकरणे पाठविण्याची गरज आहे का?

यावर श्री वाचासुंदर, वि. स. यांनी माहिती दिली की, घुसखोरांना कोणतेही संरक्षण नाही असा निर्णय मा. न्यायमूर्ती श्री धनुका यांनी दिला आहे. त्या निर्णयामुळे पूर्वीचे मा. न्यायाधीश श्री कामत यांचा, जरी घुसखोर असला तरी त्याला कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच बाहेर काढण्यात यावे, हा निर्णय रद्दबातल झाला आहे. त्यामुळे सक्षम प्राधिकारी किंवा अपिल अधिकारी यांच्याकडे घुसखोरींची प्रकरणे जाण्याची गरजच नाही.

यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर सक्षम प्राधिकारी व अपिल अधिकारी यांची मंडळास आवश्यकता नाही असे सरकारला कळविले आहे. याबाबत श्री वाचासुंदर यांनी मार्गदर्शन करून उपाध्यक्ष/प्रा. यांच्या स्तरावर चर्चा करावी, असे चर्चेअंती ठरले.

[ब] विषय- पुनर्रचित इमारतीमधील गाळयांत रहाणाऱ्या अनधिकृत रहिवाशांच्या नांवे गाळा नियमित करण्याबाबत.

वरील विषयाची बाब टिपणी पृ. क्र. १३७ वर सादर करण्यात आली आहे.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, काही लोक गाळे विकत घेऊन बराचसा कालावधी लोटला तरी आपल्या नांवे नियमित करून घेत नाहीत. म्हणून मंडळाने असा निर्णय घेतला आहे की, एक वर्षाच्या आत गाळा आपल्या नांवे नियमित करून घेतला पाहिजे.

29

त्याप्रमाणे एक वर्षाच्या आत गाळा आपल्या नांवे नियमित करुन घेतला नाही तर त्याच्याकडून दरमहा रु.६००/- गाळा नियमित करुन घेईपर्यंत वसूल करण्यात यावेत.

यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे निदर्शनास आणलेकी, लोकांनी गाळा नांवावर करुन घेण्यासाठी आवश्यक ते कागदपत्र कार्यालयात जमा करुनही मंडळाचे अधिकारी एक-दोन वर्षे झाली तरी गाळा त्यांच्या नांवे झाल्याचे आदेश काढत नाहीत. लोकांना कार्यालयात वारंवार फे-या माराव्यास लागतात. या मताशी सहमती दर्शवून मा. सदस्य श्री उतपकर यांनी असे मत व्यक्त केले की, गाळा नांवावर करुन घेण्यासाठी जशी कालमर्यादा घालून देण्यात येत आहे त्याचप्रमाणे मंडळाच्या अधिका-यांनाही ठराविक कालमर्यादेत गाळा अर्जदार व्यक्तीच्या नांवे बदलून देण्याचे आदेश पारित करावेत असे बंधन घालावे.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे निदर्शनास आणले की, सर्व कागदपत्र सादर करूनही फाईल सापडत नाही. तर मा. सदस्य श्री सातम यांनी असे मत व्यक्त केले की, गाळा विकत घेतल्यापासून एक वर्षाच्या आंत गाळा नांवे करण्यासाठी अर्ज केल्यानंतर गाळा नांवे नियमित केल्याचे आदेश केव्हा काढावयाचे तेही ठरवावे लागेल. आतापर्यंत जितके अर्ज आले आहेत त्यांच्या नांवे गाळे करण्यात आले का? सध्याच्या कर्मचा-यांवर कामाचा बोजा जास्त असल्यामुळे कर्मचा-यांची संख्या वाढविण्याची गरज आहे काय? याचाही विचार व्हावयास पाहिजे.

मा. सभापती यांनी असे मत मांडले की, अर्ज केल्यानंतर व आवश्यक ते पुरावे सादर केल्यानंतर तीन महिन्यांच्या आंत त्याचा गाळा नांवावर झाला पाहिजे.

यावर मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, म्हाड कायद्यामध्ये मिळकत व्यवस्थापनासंबंधी २४ व २५ क्रमांकाचे कलम असून २४ क्रमांकाच्या कलमाप्रमाणे रक्ताच्या नात्यातील व्यक्तींचे गाळे हस्तांतरण केले जाते तर ज्यांचा एकमेकांशी काहीही संबंध वा नाते नसते अशा व्यक्तींच्या नांवे गाळे नियमित करण्याबाबत २५ क्रमांकाच्या कलमाचा संबंध येतो. त्या कलमाप्रमाणे गाळा विकत घेताना म्हाडाची परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतु आज अशी परवानगी घेतली जात नाही व गाळे परस्पर विकले जातात व विकत घेतले जातात. अशीही प्रकरणे आहेत की, एक व्यक्ती दुस-यास विकते, दुसरी व्यक्ती तिस-यास विकते व मंडळाची नोटीस गेल्यावर विकत घेणारी चौथी किंवा पाचवी

23

व्यक्ती गाळा नांवावर करुन घेण्यासाठी समोर येते. त्यावेळी मंडळाकडून त्याला सांगण्यात येते की, गाळा विकत घेणा-या पहिल्या व्यक्तीचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन यावे आणि यापठिकाणी मुख्यत्वे वेळ लागतो. कारण मंडळाच्या रेकॉर्डवर मूळ व्यक्तीची नोंद असते. त्यानंतर तो गाळा तीन-चार व्यक्तींकडे विक्रीने हस्तांतर झाल्यामुळे पहिली व्यक्ती ते गाळा नांवावर करुन घेण्यासाठी येणारी व्यक्ती यांमध्ये नाते जोडावयाचे असते व त्यासाठी आवश्यक ते सर्व कागदपत्र गोळा करणे इत्यादी प्रक्रिया पार पाडाव्या लागतात. गाळा विकत घेतल्यानंतर एक वर्षाच्या आत गाळा नांवावर करण्याचे बंधन घातल्यानंतर, अर्जदाराकडून आवश्यक ते सर्व कागदपत्र प्राप्त झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत जर निकाल लागला नाही तर तो गाळा अर्जदाराच्या नांवावर झाला आहे असे समजण्यात यावे.

दुसरे असे की, गाळा विकत घेणारी व्यक्ती ६-७ वर्षे गाळा त्याच्या नांवे नियमित करुन घेण्यासाठी अर्ज करत नसेल तर त्याच्या या वृत्तीला आळा घालण्यासाठी त्याने गाळा विकत घेतल्यापासून एक वर्षाची कालमर्यादा निश्चित करुन त्यानंतर दरमहा दंडापोटी रु.६००/- वसूल करण्याचे धोरण ठरवावे.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे सुचविले की, अ. ने ब. ला गाळा विकल्यानंतर ब. च्या नावे गाळा करताना अ. चे ना हरकत प्रमाण पत्र घ्यावे. परंतु मध्ये आणखी तीन व्यक्ती असतील तर त्यांच्या नांवे गाळा करण्यात येऊ नये.

यावर मुख्य अधिकारी यांनी माहिती दिलीकी, अशीच प्रकरणे जास्त आहेत म्हणून सदर अट घालण्यात आली आहे. मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, तिघा-चौघांना एक गाळा विक्रीने हस्तांतरण झाल्यानंतर गाळा नांवावर करुन घेण्यासाठी मधल्या तीन व्यक्ती न येता चौथी व्यक्ती येते. त्यावेळी त्या सर्वांचा संबंध जोडावा लागतो. मा. मुख्य अधिकारी यांनी यावर असे मत मांडले की, मधल्या तीन व्यक्तींनी गाळा त्यांच्या नांवे बदलून घेतला नाही म्हणून शेवटच्या व्यक्तीला शिक्षा देणे योग्य होणार नाही. असा दृष्टीकोन असला पाहिजे. सर्व कागदपत्र सादर करण्याची जबाबदारी शेवटच्या व्यक्तीची आहे. त्याने सर्व कागदपत्र आणून दिल्यानंतर तीन महिन्यांत निकाल दिला नाही तर गाळा नांवावर करण्यास परवानगी दिली आहे असे समजण्यात यावे असे वाटते.

यावर मा. सभापती यांनी असे प्रतिपादनकेले की, शेवटच्या माणसाला त्रास होऊ नये म्हणून पहिल्या व्यक्तीलाच अट घालण्यात यावी की, गाळा त्याने नांवावर करुन घ्यावा. आज मंडळाकडे सुमारे ८ ते १० हजार अर्ज प्राप्त झाले आहेत.

२४

सहमुख्य अधिकारी/दुवपु यांनी असे निदर्शनास आणले की, इतक्या वर्षाचा लॉट एकदम आला आहे शिवाय त्यांच्याकडे कर्मचा-यांची संख्याही वाढविली जात नाही. यावर मुख्य अधिकारी यांनी निदर्शनास आणले की, कर्मचा-यांची भरती करण्यास शासन परवानगी देत नाही. मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे सुचविले की, कर्मचा-यांची संख्या कमी असल्यामुळे व कामाचा बोजा जास्त असल्यामुळे सहा महिन्यांत निकाल देण्याची अट घालण्यात यावी.

मा. सदस्य श्री साटम यांनी असे निदर्शनास आणले की, ज्याच्याकडून गाळा विकत घेतला तो मुळ भाडेकरू आहे हे सिध्द करण्याकरिता ग्रीन फॉर्मवरील माहिती तपासून पहावी लागते व त्यासाठी जास्त वेळ लागतो. व मुळ भाडेकरू आहे हे सिध्द झाल्यानंतरच अर्जदाराकडून सर्व कागदपत्र मागविली जातात.

यावर मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे सुचविले की, जर कर्मचारी कमी असतील तर काही तरी व्यवस्था करण्यात यावी. पण कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात गाळा नांवावर करुन देण्यात यावा.

सहमुख्य अधिकारी श्री नाचणकर यांनी असे निदर्शनास आणले की, पुनरचित इमारतींची संख्या दरवर्षी वाढत असून त्याप्रमाणात कर्मचा-यांची संख्या मात्र वाढविली जात नाही. कर्मचारी मागूनही दिले जात नाहीत. तीन महिन्यांची मुदत ठेवली तर तेवढ्या मुदतीत सध्या जे अर्ज आलेले आहेत ते निकाली काढू शकणार नाही शिवाय आणखी जर लॉटमध्ये अर्ज आले तर मुदत वाढवावी लागेल. त्यामुळे सहा महिन्यांची मुदत देण्यात यावी. तसेच गाळा हस्तांतरणाचे [टी. ओ. टी.] काम युनीट लिपिक त्यांच्याकडे असलेले काम सांभाळूनच करीत असतात. टी. ओ. टी. च्या कामासाठी वेगळा कर्मचारीवर्ग दिला जात नाही.

यावर मा. सदस्य श्री उसपकर यांनी असेसुचविले की, रक्ताच्या नात्याची प्रकरणे तीन महिन्यांच्या आत निकाली काढावी व नियमितीकरणाची प्रकरणे निकालात काढण्यासाठी जास्तीत जास्त सहा महिन्यांची कालमर्यादा घालण्यात यावी.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, रक्ताच्या नात्याच्या प्रकरणांसाठी वेळ लागतो. त्यांनी पुढे माहिती दिली की, त्यांच्याकडे असे एक प्रकरण आले होते की, एका इसमास दोन बायका होत्या. त्या इसमाच्या मृत्युनंतर पहिल्या बायकोच्या मुलाच्या नांवावर खोली करण्यासाठी प्रस्ताव आल्यानंतर दुस-या बायकोच्या

२८

मुलाने आक्षेप घेतला. अशा अनेक अडचणी येऊ शकतात. त्यामुळे आवश्यक ते सर्व कागदपत्रा प्राप्त झाल्यानंतर तीन महिन्यात गाळा हस्तांतरण करण्यात येईल.

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे निदर्शनास आणले की, मंडळाचे अधिकारी मन लाऊन व लोकांची जाणीव ठेऊन काम करीत नाहीत. वस्तु वस्तुस्थिती अशी आहे की, संबंधित लिपिक फाईल हरविली असे सांगतात व नको ती कागदपत्रा मागत असतात. यावर सहमुख्य अधिकारी श्री चाचणाकर यांनी माहिती दिली की, पुनरचित गाळे विभागातील दोन पैकी एक मिळकत व्यवस्थापक बदली झालेले असून एक मिळकत व्यवस्थापक रजेवर आहेत. व मा. सदस्य म्हणतात तसे साधारणपणे होत नाही. एखाददुसरी फाईल गहाळ होते.

मा. सदस्य श्री सातम यांनी अशी विचारणा केली की, मुळ भाडेकरू-सोबत त्याचे इतर नातेवाईक पूर्वीपासून जुन्या चाळीतही रहात असतात. आणि त्याची इमारत पुनर्रचित झाल्यावर व मुळ भाडेकरू रहावयास आल्यानंतर तो मृत्यु पावला आणि त्याचे रक्ताचे नातेवाईक नसतील तर पूर्वीपासून मूळ भाडेकरूसोबत जे लोक रहात असतात त्यांना अनधिकृत म्हणून समजण्यात येणार का? यावर मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, मुळ भाडेकरूसोबत त्याच्या मावशीचा मुलगा अनेक वर्षे रहात असेल व मुळ भाडेकरू मृत्यु पावला तर संबंधित अधिकाऱ्याने ३० वर्षे रहाणाऱ्या मावशीच्या मुलाच्या नांवे गाळा करावयाचा की, ३० वर्षांनी मिलीटरी किंवा परदेशातून येणाऱ्या मुळ भाडेकरूच्या मुलाच्या नांवे गाळा करावयाचा तो अधिकाऱ्यांनी निर्णय घ्यावयाचा असतो.

सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते असा निर्णय घेण्यात आला की, पुनर्रचित इमारतीतील गाळ्यात रहाणाऱ्या अनधिकृत रहिवाशाच्या नांवे गाळा नियमित करण्याबाबत, गाळा विकत घेणाऱ्या व्यक्तीने एक वर्षाच्या आत गाळा आपल्या नांवे नियमित करुन घ्यावा अन्यथा एक वर्षानंतर त्याच्याकडून दरमहा रु.६००/- गाळा नियमित करुन घेईपर्यंत वसूल करण्यात यावेत. तसेच गाळा हस्तांतरण करण्याची रक्ताच्या नात्याची प्रकरणे अर्जदाराने आवश्यक तेसंबंधीत सर्व कागदपत्र सादर केल्यानंतर जास्तीत जास्त तीन महिन्यांत अर्जदाराच्या नांवे गाळा हस्तांतरण करावे. आणि पुनर्रचित इमारतीतील गाळा विकत घेणाऱ्या व्यक्तीने आवश्यक ते सर्व कागदपत्र सादर केल्यानंतर जास्तीत जास्त सहा महिन्यांत अर्जदाराच्या नांवे गाळा नियमित करण्यात यावा.

[क] विषय- " पंचगंगा" ही रा. गां. नि. प्रकल्पातर्फे पुनर्रचित आलेली मालकी तत्वावरील इमारत दुरुस्ती मंडळाकडे भाडेतत्वावर हस्तांतरित करणेबाबत.

वरील विषयाची बाब टिपणी पृ. क्र. १३९ ते १४० वर सादर करण्यात आली आहे. रहिवाशांचे असे म्हणणे आहे की, त्यावेळी त्यांनी जरी रा. गां. नि. प्रकल्पातर्फे बांधण्यात मान्यता दिली असली तरी आर्थिकदृष्टया त्यांना आता परवडत नाही. मंडळाच्या अधिका-यांचे असे मत आहे की, सदर इमारत मंडळाकडे वर्ग करणे व्यवहार्य होणार नाही. सुकथनकर समितीचा अहवाल लवकरच येत असून त्यानुसार यापुढे सर्वच इमारती मालकी हक्काने करावयाच्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर सदर बाब पुढे ढकलण्यास हरकत नाही.

मा. सदस्य श्री सकपाळ यानी असे मत मांडले की, सदरइमारत रा. गां. नि. प्रकल्पाने बांधलेली असून रा. गां. नि. प्रकल्प आता बंद होत आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी रहिवाशांची अशी समजूत केली आहे की, रा. गां. नि. प्रकल्प बंद होत आहे त्यामुळे त्यांनी त्यांची इमारत भाडे तत्वावर दुरुस्ती मंडळाकडे द्यावी.

यावर मा. सभापती यांनी असे मत मांडले की, या योजनेवर १ कोटी ८२ लाख रा. गां. नि. प्रकल्पाने खर्च केले आहेत व मंडळाने ४४ लाख रूपये खर्च केले आहेत. त्यामुळे केंद्र सरकारकडून यावर आक्षेप येण्याची शक्यता आहे. सदर बाबत एक बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकी मध्ये मा. मंत्री श्री खैरे, विधानसभा अध्यक्ष श्री नलावडे, श्री दत्ता राणे, आणि शासनाचे विधी सल्लागार यांनी प्रदीर्घ चर्चा करुन चर्चेअंती असे ठरले की, सदर बाब शक्य नाही.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव सर्वानुमते नामंजूर करुन दप्तरी दाखल करण्यात आला.

ठराव क्रमांक : ४९/३८२

पुनर्रचित गाळे विभागाने वर सादर करण्यात आलेल्या प्रस्तावां- वर खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली.

39

[अ] ज्या घुसखोरांबाबत शासनाने स्थगिती दिलेली आहे व न्यायालयाची स्थगिती आहे अशी प्रकरणे सोडून जे निव्वळ घुसखोर आहेत त्यांच्यावर बाहेर काढण्यासाठीकारवाई करण्यात यावी. शासनाची स्थगिती असलेल्या घुसखोरांबाबत शासनाचा अंतिम निर्णय होईपर्यंत कारवाई करु नये.

[ब] पुनर्रचित इमारतीमधील गाळ्यात रहाणा-या अनधिकृत रहिवाशांचे नांवे गाळा नियमित करण्याबाबत गाळा विकत घेणा-या व्यक्तीने एक वर्षाच्या आत गाळा आपल्या नांवे नियमित करुन घ्यावा. त्याप्रमाणे त्याने गाळा आपल्या नांवे नियमित करुन घेतला नाही तर एक वर्षानंतर त्यांच्याकडून दरमहा रु.६००/- गाळा नांवे नियमित होईपर्यंत वसुल करण्यात यावेत.

तसेच गाळा रक्ताच्या नात्याच्या व्यक्तीच्या नांवे करण्याच्या प्रकरणी अर्जदाराने आवश्यक ते सर्व कागदपत्र सादर केल्यानंतर जास्तीतजास्त तीन महिन्यांत अर्जदाराच्या नांवे गाळा हस्तांतरण करण्यात यावा आणि पुनर्रचित इमारतीमधील गाळा विकत घेणा-याने आवश्यक ते सर्व कागदपत्र सादर केल्यानंतर जास्तीत जास्त सहा महिन्यांत अर्जदाराच्या नांवे गाळा नियमित करण्यात यावा. या कालमर्यादेत गाळा बदलून मिळाला नाही तर अर्जदाराच्या नांवे गाळा बदलण्यात आला आहे असे समजण्यात यावे.

[क] रा.गां.नि. प्रकल्पातर्फे बांधण्यात आलेली पंचगंगा ही इमारत मुं.इ.दु.व.पु. मंडळाकडे हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव नामंजूर करुन दप्तरी दाखल करण्यात आला.

बाब क्रमांक : ४९/५ - [सहकारी संस्था कक्ष]

विषय- इ.क्र.८,खोत बिल्डिंग या नांवाने ओळखल्या जाणा-या दादर, मुंबई-२८ येथील भूखंड व त्यावरील इमारती [नि.] गणेशकृपा स.गृ. संस्थेकरिता संपादन करण्याचा प्रस्ताव.

वरील प्रस्ताव पृ.क्र.१४९ ते १५१ वर सादर करण्यात आला आहे.

वरील प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी असे सांगितले की, सदर इमारतीची पहाणी संबंधित उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी केली असून सदर इमारतींची दुरुस्ती करुन इमारत सुस्थितीत ठेवण्याचा गाळेधारकांचा प्रस्ताव समर्थनीय आहे.

सदर प्रस्ताव चर्चेअंती सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ४९/३८४

इ. क्र. ८, खोत बिल्डिंग, दादर, मुंबई-२८ येथील गणेशकृपा स. गृ. नि. संस्थेकरिता भूखंड संपादन करण्याचा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

बाब क्रमांक:४९/६ - [उत्तरपरिमंडळ]

[अ] विषय- उपकरपात्र इमारत पाडताना त्यातील नष्टशेष सामानाची विल्हेवाट लावण्याबाबत.

वरील विषयाची बाब टिप्पणी पृ. क्र. १६३ ते १६५ वर सादर करण्यात आली आहे.

वरील प्रस्तावाची संक्षिप्त माहिती देताना मा. सभापती यांनी सांगितले की, मागील बैठकीत सदर प्रस्ताव ठेवण्यात आला होता. तेव्हा असे ठरले होते की, विधी सल्लागार/प्रा. यांचे अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करण्याचे ठरले. तद्नुसार विधी सल्लागार/प्रा. यांच्या सल्ल्यानुसार असे प्रस्तावित करण्यात आले आहे की, उपकरपात्र इमारतीचे जोपर्यंत भूसंपादन होत नाही तोपर्यंत. **इमारतीची मालकी घरमालकाकडे** असल्यामुळे अशा इमारती तोडण्याच्यावेळेस त्या इमारतीच्या नष्टशेष सामानाबाबत निर्णय घेण्यासाठी प्रत्येक वेळी मंडळापुढे प्रस्ताव ठेवण्याऐवजी संबंधित कार्यकारी अभियंता यांनी संबंधित उपमुख्य अभियंता यांच्या परवानगीने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी. सदर बाब प्रशासकीय असल्यामुळे सर्वानुमते त्यास मान्यता देण्यात आली.

[ब] विषय- उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीच्या कामाचे मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीचे प्रस्ताव पृ. क्र. उ-१ ते उ-१३९ वर सादर करण्यात आले आहेत.

पृ. क्र. उ-१ वरील इ. क्र. ८, हाथी बाग, डी. एन. सिंग मार्ग, या इमारतीच्या अंदाजपत्रकाबाबत चर्चा करताना मा. सदस्य श्री उतपकर यांनी असे निदर्शनास आणले की, अधिकची रक्कम भरण्याच्या संदर्भात पाठविलेल्या दि. १६. १०. ९७ च्या पत्रास महानगरपालिकेने दोन दिवसांनी म्हणजे दि. १८. १०. ९७ रोजी याची माहिती दिली. परंतु मंडळाने मात्र याप्रकरणी तत्परता दाखविलेली दिसत नाही. कारण किती उपकर येणे आहे हे कळविण्यासाठी मंडळाने तीन महिने घेतले. तरी यापुढे अशाप्रकारे विलंब लावण्यात येऊ नये अशी त्यांनी सूचना केली.

वरील चर्चेनंतर सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

पृ. क्र. उ-३ वरील इ. क्र. १११, अे, इंदिरा निवास या इमारतीच्या प्रस्तावावर चर्चा चालू असताना मा. सदस्य श्री खोपकर यांनी मागणी केली की, इमारतीचा ठेकेदार श्री आय. बी. खत्री याला ताबडतोब काढून टाकण्यात यावे. याबाबत मा. सदस्य श्री तावरकर यांनी अशी सूचना केली की, सदर ठेकेदारास उत्तर किंवा दक्षिण परिमंडळातील कोणतेही काम देण्यात येऊ नये. यावर संबंधित अधिकारी श्री वणीकर यांनी तसा अहवाल उत्तर परिमंडळाने दिल्यास त्या ठेकेदारास काम देण्यात येणार नाही असे आश्वासन दिले.

सदर प्रस्तावावरील सविस्तर चर्चेअंती संबंधित ठेकेदारास काढून टाकण्यास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

उत्तर परिमंडळातील दुरुस्ती कामाच्या प्रस्तावांना मान्यता देण्यापूर्वी मुख्य अधिकारी/दु. व. पु. यांनी उपस्थितांच्या असे निदर्शनास आणले की, अंदाजपत्रक तयार करताना दोन डी. एस. आर. वापरले जातात. त्यामध्ये ज्या आयटेमचा दर जास्त असेल तेथे तो डी. एस. आर. वापरला जातो हे खरे आहे का? अशी विचारणा संबंधित अभियंत्यांना केली.

यावर उपमुख्य अभियंता श्री भूवनदास यांनी माहिती दिली की, ज्या आयटेमचा दर दुरुस्तीच्या डी. एस. आर. मध्ये असतो व तो आयटेम

३८

इमारत धोकादायक असल्यामुळे इतका विलंब लावण्यात येऊ नये.

यावर श्री भूवनदास, उ. मु. अभि. यांनी खुलासा केला की, क्षेत्रफळात फरक आढळल्यामुळे तपासणीसाठी थोडा वेळ लागला. मा. सदस्य श्री असमकर यांनी अशी विचारणा केली की, जुन-जुलै मध्ये क्षेत्रफळामध्ये फरक आढळल्यानंतर त्याबाबत त्याचवेळी न कळविता दि. २०. ११. ९७ ला पत्र देण्यात आले आहे. यावर श्री भूवनदास यांनी निदर्शनास आणले की, संबंधित वास्तुशास्त्रज्ञास त्याचवेळी पत्र पाठविण्यात आले होते परंतु ते उपलब्ध नव्हते.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक : ४९/३८५ [उत्तर परिमंडळ]

[अ] उपकरपात्र इमारत तोडताना त्यातील नष्टशेष सामानाची विल्हेवाट लावण्याबाबत प्रस्तावित केल्याप्रमाणे जोपर्यंत उपकरपात्र इमारत भूसंपादित होत नाही तोपर्यंत त्या इमारतीची मालकी घरमालकाकडेच असल्यामुळे अशा इमारती तोडण्याची वेळी आली तर त्या इमारतीचा नष्टशेष सामाना बाबत निर्णय घेण्यासाठी प्रत्येक वेळी मंडळापुढे प्रस्ताव न ठेवता संबंधित कार्यकारी अभियंता यांनी संबंधित उपमुख्य अभियंता यांच्या परवानगीने नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[ब] उत्तर परिमंडळातील परिशिष्ट -अ मधील उपकरपात्र इमारतींच्या दुरूस्ती कामाचे मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सर्वानुमते प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

चर्चेच्या ओघाओघात मा. सभापती यांनी माहिती दिली की, श्री अम्मलदार, मुख्य अधिकारीयांनी सुचविल्यानुसार श्री गद्रे, नि. का. अ. सचिव यांना निमंत्रण देऊन त्यांचा आज सत्कार करण्यासाठी बोलाविण्यात आले आहे, तसेच मागील बैठकीत सन्मा. सदस्यांनी सुध्दा याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार श्री गद्रे यांचा सत्कार करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांच्यावतीने श्री गद्रे यांना श्री गणेशाची मूर्ती भेट म्हणून दिली तसेच मुख्य अधिकारी यांनी त्यांना पुष्पगुच्छ दिला. तसेच सर्व सन्मा. सदस्यांच्यावतीने मा. सदस्य श्री भालचंद्र ठाकूर यांनी श्री गद्रे यांना शाल आणि श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला.

मा. सभापती यांनी श्री गद्रे यांच्या सत्कार समारंभाच्या प्रसंगी भाषण करताना सांगितले की, श्री गद्रे यांनी आपल्या कार्यकाळामध्ये अतिशय चांगले काम केलेले आहे. निवृत्तीच्या वेळी सुध्दा त्यांच्यावर दुर्दैवाने काही अडचणींमुळे व तांत्रिक बाबींमुळे दोषारोप करण्यात आला. त्यामुळे त्यांना मानसिक तणाव फार आला. या सगळयातून ते निभाऊन निघाले. युती शासनाच्या काळात त्यांना न्याय मिळाला. त्यावेळचे मुख्य अधिकारी श्री अशोक लाल यांनी मा. अध्यक्ष/प्रा. श्री विलास अवचट यांना [illegible] अडचणींमुळे तांत्रिक अडणींमुळे श्री गद्रे यांचेवर दोषारोप करणे योग्य नसल्याची विनंती केली होती व आता त्यांना न्याय मिळाला असून त्याबद्दल त्यांनी श्री गद्रे यांचे हार्दिक अभिनंदन केले व मुख्य अधिकारी यांना सत्कारप्रसंगी दोन शब्द बोलण्यास विनंती केली. तसेच सन्मा. सदस्यांनी इच्छा व्यक्त केल्याप्रमाणे त्यांनीही श्री गद्रे यांचा सत्कार करावा अशी सूचना केली.

मुख्य अधिकारी यांनी आपल्या छोटयाशा भाषणात सांगितले की, माणसाला सरकारी नोकरी मिळाली की, त्यांची निवृत्तीही निश्चित असते. परंतु ती आनंदात होणे अपेक्षित असते. त्यांचा श्री गद्रे यांचेशी ४० दिवसांचा संबंध आला होता. तेव्हा त्यांच्या असे लक्षात आले की, श्री गद्रे हे का. अ. असूनही मुख्य अधिकारी यांच्यावतीने इतर अभियंत्यांवर जे नियंत्रण ठेवावयास पाहीजे त्याप्रमाणे त्यांनी निश्चितपणे नियंत्रण ठेवले होते. त्यांना तांत्रिक मदत करण्याची भूमिका श्री गद्रे यांनी चांगल्या प्रकारे पार पाडलेली आहे. आयुष्यात चढ-उतार हे असतात. त्याचप्रमाणे श्री गद्रे हे प्रसंगातून निभावून गेले. भाषणाच्या अखेरीस मुख्य अधिकारी यांनी श्री गद्रे यांना, [illegible] मन:शांती लाभो, कौटुंबिक जीवन सुखाचे, समृध्दीचे व चांगल्या आरोग्याचे जावो अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

श्री गद्रे यांनी स्वत:च्या सत्कारप्रसंगी भाषण करताना मा. सभापती, मुख्य अधिकारी, सन्मा. सदस्य व अधिकारीवर्ग यांनी त्यांना खास बोलाऊन सत्कार करीत असल्याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले. सेवेच्या काळात त्यांनी वेगवेगळया विभागात/मंडळात काम केल्यामुळे तसेच मुख्य अधिकारी, सभापती व मुख्य अभियंता यांच्या सहवासात काम करण्यास मिळाल्यामुळे त्यांना चांगला अनुभव मिळाला. मा. सभापती व

४३

सर्व सन्मा. सदस्यांनी प्रत्येक बैठकीच्या वेळी खेळीमेळीचे वातावरण ठेवल्यामुळे कौटुंबिक बैठक असल्यासारखाच अनुभव येत होता. मा. सभापती यांनी स्वत: गरीबी अनुभवली असल्यामुळे गरीबांच्या दु:खाची त्यांना जाणीव होती व शासकीय चौकटीमध्ये ती बसवून गरीबांना जास्तीत-जास्त न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला आहे. तसेच मा. सभापती यांनी मंडळाचा महानगरपालिकेकडे पडून असलेल्या उपकराबाबत स्वत: जातीने लक्ष घालून मंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्याकरिता खूप प्रयत्न केले. श्री गद्रे यांनी मुख्य अधिकारी यांच्याबाबत बोलताना सांगितले की, त्यांनी अनेक खात्यांमध्ये काम केलेले असल्यामुळे कोणत्याही प्रश्नाकडे बघण्याचा त्यांचा जो दृष्टीकोन आहे त्याबाबत त्यांना बरेच काही शिकावयास मिळाले. त्यामुळे वैचारिक प्रगल्भता वाढण्यास त्यांना फायदा झाला. त्यांना त्यांच्या अडचणीच्या काळामध्ये मा. श्री अवचट अध्यक्ष/प्रा., मा. श्री चव्हाण, सभापती/दु. व. पु.' व मंडळाच्या प्रत्येक सन्मा. सदस्यांनी त्यांना मानसिक व वैचारिक आधार दिल्यामुळे त्या सर्वांचा ते ऋणी असल्याचे सांगितले. मंडळाचे सन्मा. सदस्य हे मंडळाच्या बैठकीतील विषयांबाबत तपशीलवार अभ्यास करुन चर्चा करतात व मत मांडतात असे त्यांच्या निदर्शनास आले. व त्यांचा सत्कार केल्याबद्दल पुन्हा एकदा सर्वांचे मन:पूर्वक आभार मानून आपले छोटेखाणी भाषण संपविले.

बाब क्रमांक : ४९/७.

विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरपात्र इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाचे मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

वरील विषयाचे प्रस्ताव पृ. क्र. द-१ ते द-१६३ वर सादर करण्यात आले आहेत.

पृ. क्र. द-१ वरील विषया संदर्भात चर्चा करताना उपमुख्य अभियंता [द.] यांनी असे निदर्शनास आणून दिले की, दक्षिण परिमंडळात कार्यरत असलेल्या सर्व अधिकारीवर्गाचे पेजर नंबर व निवासी दूरध्वनी क्रमांक सर्व सन्मा. सदस्यांना दिले आहेत.

सविस्तर चर्चेअंती याची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.

८५

सू. क्र. द-३ वरील वास्तुशास्त्रज्ञ श्री किशोर पारकर यांच्याऐवजी अन्य वास्तुशास्त्रज्ञाची नेमणूक करण्यात सर्वानुमते मंजूरी देण्यात येऊन नोंद घेण्यात आली.

सू. क्र. द-५ वरील दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतीच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकांना प्रस्तावित केल्यानुसार प्रशासकीय मंजूरी देण्यास सर्वानुमते ठरले.

सू. क्र. द-६३ वरील इ. क्र. ३७-४५, रघुनाथ महाराज स्ट्रीट या इमारतीच्या प्रस्तावावर माहिती देताना संबंधित उ. मु. अभि. [द.] श्री वणीकर यांनी निदर्शनास आणले की, आवश्यक असेल तेवढेच दुरुस्तीचे काम करण्यास ठरवे व त्याच्या किंमतीवर ६० टक्के लावायचे तोपर्यंत अंतिम देयक द्यावयाचे नाही. असे करीत असताना असे लक्षात आले की, प्रशासकीय मंजूरी देऊन रक्कम अजूनही बिले मंजूर होत नाही. ती रिव्हीजनला यावी लागतात. अशा प्रकरणांपैकी सदर प्रस्ताव आहे. संबंधित परिपत्रकाबाबत मुख्य अधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात येणार आहे. परंतु सदर काम सध्या थांबलेले असल्यामुळे सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक सादर करण्यात आले आहे.

यावर मा. सदस्य श्री उसपकर यांनी निदर्शनास आणले की, सदर इमारतीचे १ १९९२ ते १९९७ पर्यंत काम चालू होते का? प्रस्तावात सदर काम थांबलेले नाही असे म्हटलेले नाही. तसेच दुरुस्ती उपकर १९८९ पर्यंतच भरलेला आहे. तो वसूल का केला गेला नाही?

यावर श्री वणीकर, उ. मु. अभि. यांनी माहिती दिली की, मागील बैठकीत असे सादर करण्यात आले होते की, बाजूच्या इमारतीची दुरुस्ती न होताही दुरुस्ती कर वाढला गेला आहे व ह्या इमारतीचा दुरुस्ती कर वाढला गेला आहे व विषयांकित इमारतीचा दुरुस्ती उपकर वाढला गेला नाही. जी शेजारची इमारत दुरुस्त झालेली नाही त्या इमारतीला विषयांकित इमारतीचा दुरुस्ती उपकर चुकून लावला गेला आहे. त्यामुळे विषयांकित इमारतीसाठी दुरुस्ती उपकर वाढविला नाही. इमारत दुरुस्तीमध्ये असून देखील त्याला उपकर लावलेला नाही. याबाबत महानगरपालिकेने संयुक्त पहाणी केली असून इमारतीची दुरुस्ती करण्यात येणार आहे. परंतु भाडेकरूंना उपकर भरण्याबाबतचे पत्र न गेल्यामुळे त्या भाडेकरूंनी उपकर भरलेला नाही. सदर उपकराचे पैसे मालकाने भरावयाचे आहेत. कारण भाडेकरूंच्या भाडेपावत्यांवरून दिसून येते की, त्यांनी मालकाकडे कराचे पैसे भरले आहेत. सदर इमारतीचे काम पूर्ण झालेले असून तिसऱ्या टप्प्याच्या कामाचा विशेष असा खर्च दिसत नाही. या कामाची फक्त अंतिम बिले राहीलेली आहेत.

वरील चर्चेनंतर सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

८८

४२, इस्लामपूरा स्ट्रीट या इमारतीच्या प्रस्तावाबाबत मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, पहिल्या टप्प्याची काही माहिती दाखविण्यात आली नसून नस्ती उपलब्ध नसल्याचे म्हटले आहे. यावर श्री वणीकर, उ. मु. अभि. यांनी निदर्शनास आणले की, लेखा विभागाकडून खर्चाचा तपशील घेण्यात आला आहे. त्या माहितीवरून दुस-या टप्प्याचे अंदाजपत्रक बनविले आहे. वरील माहितीनंतर सदर अंदाजपत्रक सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

इ. क्र. १५, जे. एस. एस. रोड या इमारतीच्या प्रस्तावाबाबत मा. सदस्य श्री उत्पकर यांनी निदर्शनास आणले की, सादर करण्यात आलेल्या माहितीमध्ये वास्तुशास्त्रज्ञाचे नांव कोणत्याही टप्प्यामध्ये दाखविण्यात आलेले नाही तसेच क्षेत्रफळामध्येही फरक दिसून येतो. यावर श्री वणीकर, उ. मु. अभि. यांनी मा. सदस्यांच्या सूचनेप्रमाणे वास्तुशास्त्रज्ञाचे नांवे लिहिण्यात येईल व क्षेत्रफळातील फरक मर्यादित आहे असा खुलासा केला व सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक : ४९/३८६

[१] दक्षिण परिमंडळातील सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा होऊन परिशिष्ट-ब मधील प्रस्तावांना सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सूचना व हरकतींच्या आधीन राहून सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

[२] दक्षिण परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकांना प्रस्तावित केल्यानुसार प्रशासकीय मंजूरी देण्यात आली.

अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी चर्चावयाचे विषय :-

अ] विषय: मुंबई बेटावरील जुन्या उपकरपात्र इमारतींच्या वर जाहीरातींचे फलक/होर्डिंग/साईनबोर्ड आणि डिशअँटेना लावण्यात येत असल्याबाबत.

उपरोक्त विषयाची बाब टिपणी मा. अध्यक्षांच्या परवानगीने सादर करण्यात आली होती. सदर प्रस्तावावर चर्चा करताना

मा. सदस्य श्री गोडांबे यांनी असे निदर्शनास आणले की, त्यांच्या माहितीतील एका इमारतीच्या मालकाने पैसे मिळतात म्हणून जाहीरातीचा फलक लावण्यास परवानगी दिली होती. परंतु इमारतीतील जागरुक भाडेकरुंनी आक्षेप घेतल्यामुळे फलक लावण्याचे काम थांबविण्यात आले आहे. मुख्यत्वे दादर व माहिममध्ये मुख्य रस्त्यावरील अनेक इमारतींवर अशी जाहीरातींचे फलक लावलेले दिसतात. त्या जाहीरातींचे फलकांचे वजन किमान ४ टन असते. तसेच टी. व्ही. केबलसाठीही टॉवर उभारले जातात. अशात-हेने इमारतींवर जी उपकरणे बसविण्यात येतात त्यामुळे त्या इमारतींवर प्रचंड वजन लादले जाते. मंडळाचे अधिकारी याबाबत आक्षेप घेतात व महानगर-पालिकेकडे तक्रारीही करतात. परंतु महानगरपालिकेकडून पुढे काही केल्याचे दिसून येत नाही, याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. त्यांनी पुढे असे सांगितले की, मंडळानेही केवळ तक्रार करुन गप्प न बसता कारवाई होण्यासाठी पावले उचलली पाहीजेत.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, मागे विधानसभेत या विषयाबाबत चर्चा झाली होती की, मुंबई शहरात ज्या जुन्या इमारती आहेत त्यांवर साईनबोर्ड/होर्डिंग उभारण्यास बंदी करावी. याबाबत मंडळाचे अभियांत्रिकी मत काय आहे ते कळल्यास मुख्य अधिकारी, व ते स्वतः याविषयी महानगरपालिकेशी पत्रव्यवहार करतील.

मा. सदस्य श्री उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, २१५, आर. आर. रोड या इमारतीवर बी. पी. एल. ने. उभारलेल्या साईनबोर्ड बाबत त्यांनी महानगरपालिकेकडे तक्रार केली होती व वरळी येथील महानगरपालिकेच्या विभागाने कारवाई करुन सदर साईनबोर्ड काढून टाकल्याचे नंतर त्यांना कळले. तशीच कारवाई सध्या ज्या उपकरपात्र इमारतींवर साईनबोर्ड अस्तित्वात आहेत त्यांच्याबाबत करण्यात यावी. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, सदर इमारती हया उपकरपात्र असल्यामुळे प्रथम मंडळाची परवानगी घेणे आवश्यक आहे आणि त्यानंतर आर. ओ. डी. सी. सी. कॉर्पोरेशनने करावे. म्हाडाची परवानगी न घेता अशी उपकरणे बसविण्यात आलेली आहेत.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, एम. एस. विभागातील अशी उपकरणे शोधून काढून सुरवातीलाच काही ठिकाणी ती काढून टाकण्यात आली होती.

यावर महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांनी माहिती दिली की, उपकरपात्र इमारतींच्या बाबतीत साईनबोर्डसाठी जर महानगरपालिकेकडे परवानगी मागण्यात आली तर मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र ते मागतात.

परंतु परवानगी न घेताच अनधिकृतपणे जर अशी उपकरणे उभारली गेली तर संबंधितांवर कारवाई करता येऊ शकेल.

यावर मा. सभापती यांनी संबंधित का. अ. यांच्याकडे विचारणा केली की, अशी उपकरणे बसविण्यासाठी ज्यांनी म. न. पा. कडे अर्ज केले आहेत त्यांच्याबाबतीत मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र महानगरपालिकेकडून मागण्यात आले आहे काय? यावर सर्व संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी महानगरपालिकेकडून असे नाहरकत प्रमाणपत्र कधी मागितले नसल्याचे सांगितले.

महानगरपालिका अधिकारी यांनी माहिती दिली की, स्ट्रक्चरल इंजीनीयरचा दाखला घेतल्याशिवाय महानगरपालिका इमारतींवर जाहिरातींचे फलक/होर्डिंग/साईनबोर्ड वगैरेसाठी परवानगी देत नाही.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, "अ" "ब" व "क" या वर्गातील उपकरपात्र इमारतींवर उपकरणे बसविण्यासाठी मंडळाच्या संबंधित अधिका-यांकडून परवानगी घ्यावी. अशा उपकरणांमुळे इमारतीस धोका पोहोचणार नाही असा दाखला स्ट्रक्चरल इंजिनीयरने दिला तरच ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे असा ठराव करावा किंवा "अ" व "ब" वर्गातील कोणत्याही इमारतींना परवानगी देण्यात येऊ नये. व "क" वर्गातील इमारतींच्या बाबतीत संबंधित अधिका-यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेऊन परवानगी देण्यास हरकत नाही असा ठराव करावा असे वाटते.

यावर मुख्य अधिकारी यांनी मत मांडले की, जाहीरात हे आजच्या जीवनातील एक अत्यावश्यक असे अंग आहे. इमारतींवर जाहीराती असाव्यात किं नसाव्यात ही गोष्ट वेगळी. परंतु उपकरणे उभारणीमुळे उपकरपात्र इमारतीस जर धोका पोहोचत नसेल तर जाहीरातीचा फलक उभारण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. परंतु जाहीरातच उभारावयाची नाही हे म्हणणे योग्य नाही. तसेच सरसकट जाहीराती उभारण्यास परवानगी द्यावी हेही योग्य नाही. म्हणून मंडळाच्या अभियंत्यांचे मत विचारात घेऊनच निर्णय घ्यावा असे वाटते.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी असे मत व्यक्त केले की, सरसकट जाहीराती उभारण्यास परवानगी देऊ नये असे म्हणणे योग्य नाही. तरीही एखाद्याने जर जाहीरात उभारली व काही दुर्दैवी घटना घडली तर त्याची जबाबदारी संबंधितांवर ढकलण्यापलिकडे आपण काही करू शकणार नाही.

सुदीर्घ चर्चेअंती मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, कोणत्याही "अ" वर्गातील इमारतींना परवानगी देण्यात येऊ नये. व

५५

अशा इमारतींच्या बाबतीत तांत्रिक अहवाल विचारात घ्यावा.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, मालक झाला म्हणून त्याला होर्डिंग किंवा उपकरणे बसविण्यासाठी परवानगी देण्याचा अधिकार नाही. म्हणून धोरण ठरविल्यानंतर जर त्याला न्यायालयात जावयाचे असेल तर त्याला न्यायालयात जाऊ दे. कारण उपकरपात्र इमारतीस जर काही अपघात झाला तर संबंधित अभियंत्यांवर कारवाई केली जाते, सरकार अडचणीत येते. नियम करतेवेळी ते जाचक होणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी.

सविस्तर चर्चेअंती असे ठरले की, "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतींवर जाहीरातींचे फलक/साईनबोर्ड/डिस अँटेना लावण्यास परवानगी देण्यात येणार नाही व ज्या "अ" वर्गातील इमारतींवर सध्या अस्तित्वात असलेल्या जाहीरातींच्या फलकांमुळे जर त्या इमारतीस संरचनात्मक काही धोका पोहोचतो का? याबाबत स्ट्रक्चरल इंजिनीयरने पहाणी करुन तीन महिन्याच्या आत दाखला घ्यावा व इमारतीस धोका पोहोचत असेल तर ते फलक वा उपकरणे त्वरित काढण्यात यावीत. तसेच "ब" आणि "क" वर्गातील उपकरपात्र इमारतींवरील जाहीरातींच्या फलकामुळे/डीस अँटेनामुळे इमारतीस संरचनात्मक धोका पोहोचत असल्याबद्दलचा स्ट्रक्चरल इंजिनीयरनी पहाणी करुन दाखला दिल्यास ते त्वरित काढावेत. तसेच ह्या वर्गातील इमारतींना नव्याने परवानगी देताना मंडळाच्या संबंधित का.अ. यांनी स्ट्रक्चरल इंजिनीयरचा दाखला घेऊन त्यांची खात्री पटल्यावरच ना हरकत प्रमाणपत्र द्यावे.

ठराव क्रमांक : ४९/३८७

यापुढे "अ" वर्गातील जुन्या उपकरपात्र इमारतींवर जाहिरातींचे फलक/डिस अँटेना/तत्सम ज्यामुळे इमारतीच्या संरचनात्मकतेस धोका उत्पन्न होईल अशासाठी परवानगी देण्यात येऊ नये. तसेच "ब" व "क" वर्गातील जुन्या उपकरपात्र इमारतीस परवानगी देण्यापूर्वी स्ट्रक्चरल इंजिनीयरचा दाखला घेऊन तद्नंतर परवानगी देण्याबाबत विचार व्हावा. परंतु "ब" व "क" वर्गातील उपकरपात्र इमारतींवर सध्या जे फलक लावलेले आहेत त्यामुळे इमारतीच्या संरचनात्मकतेस धोका निर्माण होत असेल तर ते ताबडतोब काढून टाकण्यात यावे या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

चर्चेच्या ओघोओघात मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, विधी शाखेकडून न्यायालयात दाखल होणा-या खटल्यांबाबत माहिती मागविण्यात आली होती. त्याप्रमाणे विधी सल्लागार यांनी सादर केलेल्या माहितीवरुन असे दिसते की, दर महिन्याला साधारणत: ८ ते १० नवीन वेगवेगळे खटले दाखल होत असतात. साधारणत: ८० टक्के निकाल मंडळाच्या बाजूने लागतात. मंडळाच्या पुनर्रचना योजने संबंधातील न्यायालयातील खटल्यांचा पाठपुरावा करुन मार्गी लावण्याचे काम विधी शाखा प्राधान्याने करीत असते.

इ. क्र. ३७-३८, सुतार गल्लीच्या प्रकरणी आता काही अडचण राहीलेली नाही. ९८, तात्या घारपूरे पथ या प्रकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात ७-८ दिवसांत निकाल होण्याची शक्यता आहे. शिंदे-पाथरे चाळीबाबत मुंबई उच्च न्यायालयात १५ दिवसांत निकाल लागेल.

मा. सभापती यांनी पुढे माहिती दिली की, गणेश भुवन या पुनर्रचित इमारतीच्या अपघाताची चौकशी करण्यासाठी करंदीकर समितीची स्थापना केली होती. समितीचा अहवाल प्राधिकरणासमोर प्रथम येणे अत्यंत आवश्यक होते. परंतु कोणत्या ना कोणत्या कारणामुळे वर्तमानपत्रात त्याबाबत छापून आले. त्यामुळे त्यांनी प्राधिकरणाच्या अध्यक्षांना विनंती केली की, सदर बाब ही वर्तमानपत्रात छापून आलेली असल्याने व मंडळाशी संबंधित सदर इमारत असल्यामुळे मंडळाच्या सदस्यांनाही या बातमी बाबत माहिती असणे आवश्यक वाटते. सर्व सन्मा. सदस्यांची इच्छा असल्यास या एकाच विषयावर एक अनौपचारिक बैठक बोलवावी. वरील माहितीनंतर त्यांनी मुख्य अधिकारी यांना विनंती केली की, करंदीकर समितीने दिलेल्या अहवालातील निष्कर्षांची सभागृहास थोडक्यात माहिती द्यावी.

मा. सभापती यांनी विनंती केल्यानुसार मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, मागील बैठकीत सर्व सन्मा. सदस्यांना सांगितले होते की, करंदीकर समितीचा अहवाल तयार झाल्यानंतर त्या अहवालाची प्रत मिळवून बैठकीत चर्चा करण्यात येईल. त्याप्रमाणे मंडळाची बैठक ठरल्यानंतर त्यांनी श्री करंदीकर, मुख्य अभियंता यांना अहवाल तयार असल्यास तो देण्यात यावा म्हणजे त्यावर मंडळाच्या बैठकीत चर्चा करणे शक्य होईल असे सांगितले असता श्री करंदीकर यांनी अहवाल तयार झाला असला तरी सदर अहवाल प्राधिकरणासमोर येऊन चर्चा झाल्याशिवाय दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या बैठकीत चर्चा करणे योग्य होणार नाही असे सुचविले. परंतु जर

या अहवालाबाबत वर्तमानपत्रात छापून येऊन प्रसिध्दी मिळू शकते तर मंडळाच्या बैठकीत चर्चा का होऊ शकत नाही? कारण गोपनीय असे आता काही राहीलेले नाही. त्यानंतर मा. अध्यक्ष/प्र. यांनी सदर अहवालाबाबत बैठकीत चर्चा करण्यास परवानगी दिली व त्यानंतर अहवाल वाचून एक टिपणी थोडक्यात तयार करण्यात आली आहे. वरील माहितीनंतर मुख्य अधिकारी यांनी सभागृहात सदर टिपणी वाचून दाखविली. टिपणीनुसार गणेशभुवन या पुनर्रचित इमारतीच्या अपघाताची संभाव्य कारणे पुढीलप्रमाणे थोडक्यात नोंदविण्यात आली आहेत.

[१] इमारतीच्या बांधकामात वापरण्यात आलेले सिमेंट काँक्रिट अपेक्षित दर्जाचे नव्हते कारण सिमेंट काँक्रिटचे मिश्रण करण्यासाठी आजूबाजूस असलेली अपूरी जागा, त्यामुळे आवश्यक असणारे पाणी साठविण्याची सोय नव्हती. त्यामुळे बांधकामाचे क्यूरिंग बरोबर न झाले नसण्याची शक्यता आहे.

[२] सदर बांधकाम १९७८ ते १९८१ या कालावधीतील असून त्या काळात सिमेंटची टंचाई होती म्हणून कमी सिमेंट वापरण्याची शक्यता नाकारता येत नाही,

[३] इमारत २० निवासी व २ अनिवासी वापराकरिता बांधण्यात आली होती परंतु ती कोसळली तेव्हा १७ अनिवासी व ५ निवासी अशी स्थिती होती.

[४] इमारतीतील अंतर्गत फेरबदलांमुळे स्ट्रक्चरल घटकावर भार आल्याचे १९९२ मध्येच दिसून आले होते. परंतु त्यावर कारवाई करण्यात आल्याचे दिसून येत नाही,

[५] आवश्यकतेपेक्षा कापडाचा साठा जास्त केल्यामुळे इमारतीच्या पायावर असह्य वजन पडले.

[६] तळ मजल्यावरील गोडाऊनमध्ये पोटमाळ्याचा पूर्ण भाग मुळ कॉलमवर घेण्यात आला होता. त्यासाठी वेगळे फाऊंडेशन घेतले नव्हते.

[७] वरील सर्व कारणांच्या एकत्रित परिणामांमुळे अपघात घडतेवेळी इमारतीच्या संरचनेमध्ये एखाद्या विवक्षित ठिकाणी अचानक बाधा येऊन एकूण तोल ढासळला व इमारत कोसळली.

भविष्यात अशी दुर्घटना घडू नये म्हणून पुढीलप्रमाणे खबरदारी घेण्याबाबत करंदीकर समितीने सुचविले आहे.

[१] पुनर्बांधणी करण्याच्या ठिकाणी बांधकाम साहित्य व सामुग्री नेण्यासाठी जर पोहोच रस्ता नसेल तर परवानगी देण्यात येऊ नये,

६१

[२] इमारतीच्या आजूबाजूस सांडपाणी जाण्यासाठी पुरेशी सोय नसेल तर परवानगी देण्यात येऊ नये,

[३] निवासी गाळ्यांचा वापर अनिवासी वापरासाठी कोणत्याही परिस्थितीत परवानगी देऊ नये,

[४] उचित यंत्रणा निर्माण करुन अंतर्गत फेरबदल करण्यास आळा घालावा.

[५] मॅझिनीन् फ्लोअर किंवा पोटमाळयामुळे संरचनेवर भार वाढल्यास उचित कारवाई त्वरित होण्यासाठी मार्ग व उपाय योजावेत.

[६] इमारतीचे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाचे साहित्य चांगल्या दर्जाचे असावे जेणेकरुन गळती किंवा अडथळे किंवा तुंबणे या गोष्टी होणार नाहीत,

[७] सां.बां. विभागाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे सिमेंट काँक्रिट एम-२० किंवा त्यापेक्षा अधिक दर्जाचे असावे,

[८] खांब, तुळया, बीम, कॉलम व शौचालयाच्या बांधकामातील लोखंडास ॲन्टीकरोसीव्ह ट्रीटमेंट करण्यात यावी जेणेकरुन लोखंड गंजून संरचनात्मक शक्ती क्षीण होणार नाही.

मुख्य अधिकारी यांनी ~~विचारणा केली~~ सांगितले की, करंदीकर ~~समितीच्या~~ अहवालाची खूप पृष्ठे असून सन्मा. सदस्यांना पाहिजे असल्यास त्याच्या प्रती काढून देण्यात येतील. यावर सर्व सन्मा. सदस्यांनी सभागृहात वाचून दाखविलेल्या माहितीची प्रत त्यांना द्यावी अशी मागणी केली.

उप सचिव श्री कोकणे यांनी असे निदर्शनास आणले की, अहवालानुसार गणेश भुवन ज्या भूखंडावर आजच्या परिस्थितीत बांधण्यात आली होती अशा परिस्थितीत पुन्हा इमारत बांधण्यात येऊ नये. परंतु यापूर्वीच्या बैठकीमध्ये गणेश भुवनच्या पुनर्बांधणीस मान्यता दिलेली असल्यामुळे आपण या अहवालाच्या विरोधात कार्यवाही केल्याबाबत मंडळावर ठपका येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी असे मत व्यक्त केले की, योग्य ती काळजी घेऊन इमारत बांधण्यास हरकत नाही अन्यथा अहवालाप्रमाणे दक्षिण मुंबईत किती इमारती बांधता येतील याचाच विचार करावा लागेल. कारण जवळजवळ सर्वच ठिकाणी अरुंद भूखंड आहेत अशी स्थिती आहे. म्हणून या विषयाबाबत जी बैठक घेण्यात येईल तेव्हा सूचना बैठकीत मांडण्यात याव्यात.

मुख्य अधिकारी यांनी अशी सूचना केली की, अहवालामध्ये ज्या परिस्थितीमध्ये इमारत बांधू नये असे म्हटलेले आहे, त्याठिकाणी लोखंडी

सामान वापरुन बांधकाम करावयाच्या सूचना व प्रस्ताव आहेत. याशिवाय ज्यावेळी या विषयावर चर्चा होईल त्यावेळी मुख्य अभियंता श्री करंदीकर यांना विनंती करुन सन्मा. सदस्यांना याबाबत अधिक माहिती देण्याबाबत विचारणा करता येईल. पुढे त्यांनी असे निदर्शनास आणले की, गणेश भुवन या इमारतीच्या पुनर्बांधणीस मुख्य अभियंता/प्रा. श्री हडदरे यांनी मंजूरी दिलेली आहे. अशा परिस्थितीत उ.मु.अभि. श्री परब यांनी दरम्यानच्या काळात करंदीकर समितीच्या अहवालातील शिफारशी लक्षात घेता जे पुनर्बांधणीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे ते श्री करंदीकर यांनी पाहून घ्यावे, असे अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात नमूद करावे म्हणजे ते अंदाजपत्रक श्री करंदीकर यांच्याकडे पाठविण्यात येईल. त्यामुळे पुनर्बांधणीचा घेतलेला निर्णय हा करंदीकर समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने कितपत तात्त्विकदृष्टया बरोबर आहे ? याबाबतचे मत ते देतील.

यावर मा. सभापती यांनी असे सुचविले की, श्री करंदीकर यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यापेक्षा श्री हडदरे यांनाच सांगावे की, श्री करंदीकर यांचे असे मत आलेले आहे. त्यावर आपले काय मत आहे ते श्री करंदीकर यांच्याशी सल्लामसलतीने घेता येईल. त्यास सर्व सन्मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

मुख्य अधिकारी यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणले की, गणेश भूवन इमारत पडल्यानंतर मलबा [डेब्रीज] काढण्याकरिता आणि जागा साफ करण्याकरिता जो खर्च आला त्या खर्चाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव मागील बैठकीत विचारार्थ व मान्यता देण्यासाठी ठेवण्यात आला होता. त्यावेळी असे ठरले होते की, मुख्य अधिकारी यांनी तपासणी करुन पुन्हा एकदा अहवाल सादर करावा. त्याप्रमाणे मा. सभापती यांना विनंती करुन संबंधित अधिकाऱ्यांसहीत एकत्र बसलो व जे निष्कर्ष त्यांनी काढले आहेत ते थोडक्यात सादर करण्यात येत आहेत.

तत्पूर्वी मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, वर्तमानपत्रात असे छापून आले आहे की, सर्व सदस्यांनी विरोध करुनही सभापती यांनी सदर प्रस्ताव मान्य करुन घेतला. खरे तर असे झालेलेच नाही. त्यामुळे वर्तमानपत्रातील बातमी ही चुकीची आहे. मुख्य अधिकारी यांनी यानंतर बैठकीत झालेल्या चर्चेची संक्षिप्त माहिती सभागृहास देऊन असे प्रतिपादन केले की, अपघाताच्या पहिल्या दिवसापासून शेवटच्या दिवसापर्यंत सारखेच मजदूर उपस्थित होते असे गृहीत धरुन बील मंजूर करण्यात आले आहे ते बरोबर नाही. कारण दररोज तिन्ही पाळ्यांना शेवटच्या दिवसापर्यंत सारखीच माणसे काम करतात असे असणे शक्य नाही असे वाटते.

श्री चटर्जी यांना परदेशात जावयाचे होते म्हणून त्यांना रिलीव्ह केल्यामुळे व मुख्य अधिकारी या पदावर कोणीही नसल्यामुळे प्राधिकरणाकडे प्रकरण सादर करण्यात आले.

यावर उप सचिव श्री कोकणे यांनी असे निदर्शनास आणले की, याबाबतचे घटनाक्रम पहाता मुख्य अधिकारी यांना अंधारात ठेवण्याचा हेतू दिसत नाही कारण मुख्य अधिकारी यांना जर अंधारात ठेवावयाचे असते तर उपाध्यक्ष/प्रा. यांना तरी सदर बाब दाखविण्याची काय गरज होती? त्यावेळचे मुख्य अधिकारी परदेशात जाण्याच्या गडबडीत होते व नवीन मुख्य अधिकारी यावयाचे होते. अशा परिस्थितीत उपाध्यक्ष/प्रा. यांची मान्यता घेण्यात आली आहे. परंतु त्यानंतर नियमित मुख्य अधिकारी हे पद भरल्यानंतर बाब त्यांच्या निदर्शनास आणणे आवश्यक होते.

मा. सभापती यांनी पुढे माहिती दिली की, वरील प्रकरणानंतर त्यांनी व मुख्य अधिकारी यांनी एक बैठक घेऊन निष्कर्ष काढले आहेत व प्रशासकीय चौकशी ही एखाद्या व्यक्तीस डोळ्यासमोर ठेऊन न करता आपत्कालिन व्यवस्थेसाठी काही नवीन यंत्रणा उभी करता येईल का? ते पहावे. असे ठरले आहे. याकरिता संबंधित कार्यकारी अभियंता यांना सूचना देण्यात आल्या आहेत की, त्यांनी त्या त्या स्तरावर संपर्क साधून नेव्ही, बी.पी.टी, रेल्वे हे आपत्कालिन वेळी काय व्यवस्था करतात, मोठमोठ्या क्रेन्सद्वारे कशात-हेने स्लॅब उचलतात, डेब्रिज बाजूला काढतात, याबाबत माहिती मिळविण्यात यावी.

मा. सदस्य श्री मोडक यांनी मागील बैठकीत आश्वासन दिल्याप्रमाणे मुख्य अधिकारी यांनी गणेश भूवन इमारतीच्या बाबतीत आलेल्या खर्चाचा आढावा सादर केल्याबद्दल अभिनंदन केले. व अशाप्रकारची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून संबंधित अधिका-यांनी काळजी घ्यावी अशी सूचना केली.

श्री नाचणकर, स.मु.अ./दु.व.पु. यांनी माहिती दिली की, मागील बैठकीत याच विषयाच्या अनुषंगाने मृत व्यक्तींच्या वारसांना नुकसान भरपाई म्हणून रुपये एक लाख देण्याबाबत जो प्रस्ताव सादर करण्यात आला होता तो मंडळाने नामंजूर करुन प्राधिकरणाकडे मंडळाच्या पाठविण्यात आला होता. व प्राधिकरणानेही मंडळाच्या मताशी सहमती दर्शवून प्रस्ताव नामंजूर केला आहे. व उपकरपात्र इमारतींतील जखमी व्यक्तींसाठी रु.१०,०००/- चे रु.५,०००/-करण्याचा जो प्रस्ताव सादर करण्यात आला होता तो प्रस्ताव पुढे ढकलण्यात येऊन मा. सदस्य श्री भूवड

यांनी त्या बैठकीत आश्वासन दिल्याप्रमाणे एम्. एस्. एस्. सी. टी. ॲक्टप्रमाणे ज्या सुधारणा झाल्या आहेत त्याची माहिती दिली असून सदर माहिती लक्षात घेऊन पुढील बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात येईल.

आयत्या वेळचे विषय :-

मा. सदस्य श्री सकपाळ यांनी असे निदर्शनास आणले की, डिलाईड रोड येथे ब-१९, हरारे या इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे. इमारतीच्या भाडेकरुंनी सुधारित अंदाजपत्रक बनविण्यास विनंती केली होती परंतु काही कारणांमुळे सदर इमारतीचे सुधारित अंदाजपत्रक आजच्या बैठकीत सादर करण्यात आलेले नाही. तरीही ठेकेदाराला काम बंद करण्यास सांगू नये, काम चालू ठेवण्यास सांगावे व पुढील बैठकीत सुधारित अंदाजपत्रक करुन झालेल्या खर्चास मंजूरी घ्यावी, ह्या मताशी सहमती दर्शविण्यात आली.

श्री भूवनदास, उ.मु.अभि. यांनी माहिती दिली की, मा. सदस्य श्री खोपकर यांनी आजच्या बैठकीत एका इमारतीचे अंदाजपत्रक ठेवण्यास सांगितले होते. परंतु सदर अंदाजपत्रक अद्याप तयार करण्यात आलेले नाही.

यावर मा. सदस्य श्री खोपकर यांनी निदर्शनास आणले की, सदर अंदाजपत्रक बैठकीत ठेवण्याबाबत त्यांनी एक महिन्यापूर्वीच पत्र देऊन कळविले होते. तरीही अंदाजपत्रक आजच्या बैठकीत सादर करण्यात न आल्यामुळे नाराजी व्यक्त केली. यावर श्री भूवनदास, उ. मु. अभि. यांनी माहिती दिली की, मा. सदस्यांनी जरी पत्र दिले असले तरी वास्तुशास्त्रज्ञ नेमून अंदाजपत्रक बनविण्यासाठी वेळ लागतो. वास्तुशास्त्रज्ञाच्या नियुक्ती-नंतर त्यांना २१ दिवसांची मुदत द्यावी लागते, व सदर अंदाजपत्रक पुढील बैठकीत ठेवण्यात येईल असे त्यांनी आश्वासन दिले.

मा. सदस्य श्री सावरकर यांनी असे निदर्शनास आणले की, मागील एका बैठकीत असा निर्णय झालेला आहे की, विभागीय कार्यालयात एक विधी सल्लागार नियुक्त करण्यात येईल. परंतु अजून कोणत्याही कार्यालयात विधी सल्लागारांची नेमणूक न करण्यात आल्यामुळे संबंधित अधिकारी हे ब-याचवेळा न्यायालयात गेलेले असतात. निर्णय होऊनही तो अंमलात न आणल्यामुळे पुन्हा एकदा याबाबत गंभीरपणे विचार करण्यात यावा. प्राधिकरणाकडून याबाबत काही उत्तर

आले असल्यास त्याची त्यांना माहिती द्यावी.

मा. सदस्य श्री भूवड यांनी असे निदर्शनास आणले की, कुलाबा संक्रमण शिबीरास भेट देण्यासाठी मा. सभापती आणि मुख्य अधिकारी यांना विनंती करुनही त्यांनी अद्याप भेट दिलेली नाही. तरी त्यांनी १-२ दिवसांत भेट द्यावी अशी पुन्हा विनंती केली.

मा. सदस्य श्री उतपकर यांनी असे निदर्शनास आणले की, कुलाबा संक्रमण शिबीरातील काही व्यावसायिक गाळे अजूनही तसेच पडलेले आहेत. त्याबाबत काही निर्णय घेण्यात येणार आहे काय?

यावर श्री पाटील, मि. व्य. यांनी माहिती दिली की, कुलाबा संक्रमण शिबीरातील पडून राहिलेल्या अनिवासी गाळ्यांचे वितरण करण्यासाठी जाहीरात देण्याबाबत मुंबई मंडळास कळविले आहे. मा. सभापती यांनी मुंबई मंडळाचा या बाबीशी संबंध काय? अशी विचारणा केली असता श्री पाटील यांनी माहिती दिली की, तेव्हाच्या मुख्य अधिका-यांचे आदेश आहेत की, कोणत्याही दुकानी गाळ्यांचे वाटप हे मुंबई मंडळाने जाहीराती व्दारे करावे. यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, सदर मालमत्ता ही दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची असल्यामुळे मुं. गृ. व. क्षे. मंडळाचा काही संबंध येता कामा नये. त्यामुळे सदर विषय हा मुंबईमंडळाचा असला तरी तो मुं. इ. दु. व. पु. मंडळाच्या अखत्यारित करुन घेण्यात यावा अशा सूचना दिल्या. तसेच सदर गाळे जास्तीत जास्त भाडे देणा-या व्यक्तीस वितरीत करण्याची पध्दत असल्याचे प्रतिपादन केले.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी अशी मागणी केली की, मागील बैठकीत त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयावर पुढे काय कार्यवाही करण्यात आली. याबाबत माहिती द्यावी. यावर महानगरपालिका अधिकारी यांनी माहिती दिली की, कारवाई करण्यासाठी विभागीय कार्यालयास कळविण्यात आले होते व त्यांनी केलेल्या कारवाईचा अनुपालन अहवाल एक आठवडयात त्यांना पाठविण्यात येईल.

पूर्तता कार्य. अभियंता महानगर पालिका.

यावर मा. सभापती यांनी संबंधित का. अ. /फ, उत्तर यांना सूचना दिल्या की, मंडळाने महानगरपालिकेकडे जी तक्रार दिली आहे त्या तक्रारीची प्रत मा. सदस्य श्री विश्वासराव यांना देण्यात यावी.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे निदर्शनास आणले की, मुंबईत २२ ~~ठिकाणी~~ इमारती पडल्यानंतर भूखंड मंडळाच्या ताब्यात आलेले आहेत. तरीही त्या भूखंडावर अनधिकृत बांधकाम करण्यात आले व इमारतीतील भाडेकरु मात्र संक्रमण शिबीरात खितपत पडलेले आहेत. अनधिकृत बांधकाम होऊनही कारवाई न झाल्यामुळे मुळभाडेकरुंना जागा इमारतीत

मिळाल्या नाहीत व त्यांना बृहत्सूचीवर घेण्याबाबत मागणी केली होती. त्याबाबतही काही निर्णय झालेला नाही.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, सदर प्रकरण शासनाचे मुख्य सचिव यांच्याकडे निर्णयासाठी आहे. मंडळाच्या भूखंडावर अनधिकृतपणे केलेल्या बांधकामाबाबत मंडळाचे असे म्हणणे आहे की, रिकाम्या भूखंडावर अनधिकृतपणे इमारत उभी राहीली त्यास महानगर-पालिका जबाबदार आहे. त्यामुळे महानगरपालिकेने त्यांच्याकडील गाळे मंडळास द्यावे किंवा तेवढे भूखंड द्यावे. अशा इमारतीतील मूळ भाडेकरुंना बृहत्सूचीवर घेण्याबाबत विधी सल्लागार/प्रा. यांचा सल्ला मागितला असता त्या भाडेकरुंना बृहत्सूचीवर घेता येणार नाही असा त्यांनी सल्ला दिलेला आहे. म्हणून यातून मार्ग काढण्यासाठी मुख्य सचिव यांच्याकडे प्रकरण प्रलंबित आहे.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, पडलेल्या/पाडलेल्या इमारतीच्या भूखंडा शेजारील इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजने अंतर्गत ती इमारत पुनर्रचित होण्यास वेळ लागतो. अशा इमारतीतील भाडेकरु अनेक वर्षे संक्रमण शिबीरात रहात आहेत. त्या भाडेकरुंना बृहत्सूचीत समाविष्ट करुन पुनर्रचित इमारतीतील जागा देण्यात याव्यात. त्यांना अशीही उदाहरणे माहीत आहेत की, इमारत पडून २० वर्षे झाली तरी इमारतीची पुनर्रचना केली गेली नाही व त्या लोकांना बृहत्सूचीवरही घेतले जात नाही. आणखी किती वर्षे त्या लोकांना संक्रमण शिबीरात रहावे लागणार आहे. यावर मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, पाडलेल्या किंवा पडलेल्या किंवा पाडण्यात यावयाच्या उपकरपात्र इमारतीतील लोकांना पुनर्रचित इमारतीत जागा देणे हे मंडळाचे कर्तव्य आहे. ब-याचशा जुन्या चाळीतील खोल्या ह्या १० x १२ च्या असतात. परंतु मंडलाला मात्र किमान १८० चौ. फू. गाळे त्या भाडेकरुंना उपलब्ध करुन द्यावे लागतात. त्यामुळे जुन्या चाळीत जर १०० भाडेकरु असतील तर ६० किंवा ८० भाडेकरुंचीच जागा पुनर्रचित इमारतीत तयार होते. दुसरी गोष्ट अशी की, विकास आराखडा योजने मुळे किंवा शासनाच्या अन्य योजनेमुळे इमारतींची पुनर्बांधणी करता येत नाही. अशा इमारतीतील लोकांना बृहत्सूचीवर घेऊन पुनर्रचित गाळे द्यावे लागतात व ज्या बैठ्या चाळी होत्या त्यांचा पूर्ण चटईक्षेत्र निर्देशांक वापरला गेला नव्हता अशा प्रकरणी बहुमजली इमारती बांधून अतिरिक्त गाळे रहिवाशांना दिले जातात.

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, जे लोक २०-२० वर्षे संक्रमण शिबीरात रहात आहेत व आणखी दहा वर्षे त्यांच्या इमारती पुनर्रचित होणार नाहीत अशा लोकांना बृहतसूचीवर घेण्यात यावे व जुन्या इमारतीतील त्यांच्या जागेचा हक्क सोडून देण्यास ते तयार आहेत असे प्रतिज्ञापत्र घेऊन त्यांना इतर पुनर्रचित इमारतीतील जागा देण्यात याव्यात. परंतु विधी सल्लागार यांनी दिलेल्या सल्ल्याप्रमाणे ते शक्य नसल्यामुळे यातून काहीतरी मार्ग काढणे आवश्यक आहे. यावर मुख्य अधिकारी यांनी आश्वासन दिले की, विधी सल्लागारांचा सल्ला लक्षात घेता याबाबत शासनाकडून मार्गदर्शन घेऊन त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, वडाळा संक्रमण शिबीरात बहुमजली इमारती बांधून ५ महिन्यांपासून तयार असूनही पाण्याचे कनेक्शन न मिळाल्यामुळे गाळ्यांचे वाटप करण्यात आलेले नाही.

यावर श्री भूवनदास, उ. मु. अभि. यांनी माहिती दिली की, पाण्याच्या वाढीव दराबाबत मंडळ व महानगरपालिका यांच्यामध्ये वाद चालू असून महानगरपालिका सध्याच्या वाढीव दराप्रमाणे पैसे भरण्यास सांगत आहे. परंतु मंडळाचे ठेकेदार वाढीव दराने पैसे भरण्यास तयार होत नाहीत. कामाच्या निविदेच्या वेळेस जी रक्कम त्यांनी नमूद केलेली आहे तेवढी भरण्यास ते तयार आहेत. वाढीव दराबाबत श्रीमती शरयू गोखले, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे बैठक घेण्यात आली होती. परंतु मंडळाची मागणी त्यांनी नाकारली आहे. आता वरिष्ठ पातळीवर सदर बाब नेण्याचा विचार आहे.

यावर मा. सदस्य श्री विश्वासराव यांनी असे मत व्यक्त केले की, वरिष्ठ पातळीवर चर्चा करताना मा. सभापती यांचीही मदत घ्यावी. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, या विषयाबाबत त्यांनी महानगरपालिकेला पत्र दिलेले आहे. परंतु महानगरपालिकेने कळविले की, मंडळासाठी वेगळा दर आकारता येत नाही. शासनाकडून जर तसे आदेश आणले तर मंडळाची मागणी मान्य करता येईल. त्यांनी महानगर-पालिकेला असे सुचविले की, त्यांच्या सभागृहात सदर प्रस्ताव मंजूर झाला की, स्टँडिंग कमिटीची त्या प्रस्तावास मंजूरी घेऊन वेगळा दर ते आकारू शकतात. परंतु तसे करण्यास महानगरपालिका तयार नाही. पुढे त्यांनी माहिती दिली की, वडाळा येथील बहुमजली संक्रमण शिबीरातील गाळे संक्रमण शिबीरात ज्यांना २० वर्षे झालेली आहेत व आणखी काही वर्षे ज्यांच्या इमारती पुनर्रचित होणार नाहीत त्यांना हे गाळे यावेत, हा मा. सदस्यांचा

मुद्दा मुख्य अधिकारी व मा. गृहनिर्माण मंत्री महोदय यांच्या निदर्शनास आणण्यात आला आहे व एस. आर. ए. योजनेसाठी ते गाळे देण्यात येऊ नयेत हे मंडळाचे मतही त्यांच्या निदर्शनास आणण्यात आले आहे.

मा. सदस्य श्री तिकोने यांनी सूचना केली की, १८, मंगेश शेणॉय स्ट्रीट या इमारतीतील भाडेकरू १९७७ पासून बोरीवली संक्रमण शिबीरात रहात आहेत. त्यांची इमारत पुनर्रचित होणार नाही असे चौकशीनंतर त्यांना सांगण्यात आले आहे. तरी याबाबत एक महिन्यात प्रगतिदारक असा अहवाल देऊन सदर प्रश्न घसास लावावा.

मा. सभापती यांनी निदर्शनास आणले की, मागील बैठकीत अरुंद भूखंडावर इमारत बांधता येणे शक्य आहे किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे बांधकाम करता येण्यासारखे १९ भूखंड निदर्शनास आणून देण्यात आले आहेत. त्यांनी पुढे सूचना दिल्या की, या भूखंडाबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक करण्यात यावी. कारण २०-२० वर्षे संक्रमण शिबीरात रहाणा-या लोकांबाबत गांभीर्याने निर्णय होण्याची गरज आहे.

मा. सदस्य श्री मोडक यांनी सूचना केली की, विधानसभा अध्यक्ष यांच्या मतदारसंघातील बारा चाळीच्या बाबतीत मा. सभापती यांनी स्वत: लक्ष घालावे. त्या ३-४ चाळी आहेत. मुलांना शाळा/कॉलेजमध्ये प्रवेश घेणे सोयीचे व्हावे म्हणून गाळ्यांचे आतापासून वितरण करावे.

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, पाण्याच्या जोडणीबाबत समस्या असून मार्चपर्यंत प्रश्न सोडविण्यात येईल. त्यांनी नंतर असे निदर्शनास आणले की, त्रिशूळ इमारतीत अद्याप काही गाळे रिकामे असून भाडेकरूंना मिळालेले नाहीत. मा. मंत्री महोदयांकडे सदर प्रश्न विचाराधीन आहे. प्रभूच नावाच्या बाईस मंडळाने अजूनही जागा दिलेली नाही.

दुसरे असे की, काही गाळेधारक निवासी गाळ्यांचा अनिवासी म्हणून वापरत करीत आहेत. अशा गाळेधारकांवर संबंधित अधिका-यांनी कारवाई केली पाहीजे. तसेच रत्नसिंधू, स्वामी सदन, साई सदन, बजरंगकृपा या पुनर्रचित इमारतींमध्ये गळती आहे. पाईप तुटलेले आहेत, वाळवी लागलेली आहे. याबाबत संबंधित अधिका-यांना कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात, अशी विनंती केली.

यावर मा. सभापती यांनी श्री पालीवाल, कार्यकारी अभियंता यांना सूचना दिल्या की, मा. सदस्यांनी निदर्शनास आणलेल्या तक्रारींबाबत उपाय योजना करण्यात यावी.

मा. सदस्य श्री मोडक यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, बजरंग कृपा या इमारतीतील एका रहिवाशाच्या व्हेकेशन नोटीसवरील टंकलिखित चुकीमुळे त्याला सदनिका मिळण्यात अडचण निर्माण झालेली आहे.

यावर मा. सभापती यांनी उपमुख्य अधिकारी श्री मोरे यांना सूचना दिल्या की, मा. सदस्यांनी निदर्शनास आणल्याप्रमाणे जर लिहिण्यात चूक झाली असेल किंवा टंकलिखित चुक झालेली असेल तर संबंधित रहिवाशाकडून प्रतिज्ञापत्र घेऊन प्रकरण निकाली काढण्यात यावे.

मा. सदस्य श्री मोडक यांनी असे निदर्शनास आणले की, खाजगी विकसकांना संक्रमण शिबीरातील पर्यायी गाळे दिले जातात. परंतु विकसक त्यांची पुनर्बांधणी योजना वरीचे वर्षे पूर्ण करीत नाहीत. अशा योजनेतील भाडेकरुंना किती वर्षे संक्रमण शिबीरात ठेवण्यात येणार आहे? योजना पूर्ण करण्यासाठी त्यांना काही कालमर्यादा घालण्यात येते का? किंवा त्यासाठी काही नियम आहेत का?

यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, ज्या कार्यालयाने विकसकाला परवानगी दिलेली असते त्यांना याबाबत विचारावे लागेल. यापुढे विकसकाला योजना राबविण्यासाठी पर्यायी गाळे देण्यापूर्वी त्याने पुनर्बांधणी योजना किती दिवसांत पूर्ण करावी याबाबत अटी सुकथनकर समितीच्या अहवालानुसार घालण्यात येणार आहेत.

यावर श्री पालीवाल यांनी माहिती दिली की, ज्या ज्यावेळी मा. सदस्यांनी त्यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत त्या तक्रारींकडे त्यांनी वेळीच लक्ष देऊन केलेल्या कार्यवाहीबाबत त्यांनी माहिती दिलेलीआहे. व आता जेव्हा त्यांची तक्रार मिळाली तेव्हा संबंधित कनिष्ठ अभियंत्यांसह पहाणी करुन ज्या तक्रारींवर कार्यवाही करणे शक्य आहे व ज्या तक्रारींवर कार्यवाही करणे शक्य होणार नाही त्याबाबत मा. सदस्यांना माहिती देण्यात आलेली आहे.

मा. सदस्य श्री दाजी मोडक यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, मंडळाच्या संक्रमण शिबीरामध्ये खाजगी विकासकाला गाळे देतो त्याला काही कालमर्यादा आहे का?

बैठकीच्या अखेरीस मा. सभापती यांनी सूचना दिल्या की, आजच्या बैठकीत सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या सूचना व घेतलेल्या हरकतींची नोंद घेऊन सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी व मा. सभापती यांनी सर्वांचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले.

सही/-
सचिव/नि. का. अ, दु. व. पु.

सही/-
मुख्य अधिकारी/दु. व. पु.

सही/-
मा. सभापती/दु. व. पु.

दिनांक २६.११.९७ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ४१ व्या

बैठकीत मंजूर करण्यात आलेली अंदाजपत्रके [उत्तर परिमंडळ]

परिशिष्ट "अ"

क्र.	विभाग	कार्यकारी	इमारतीचा तपशिल	दुरुस्तीचा टप्पा / मंडळ/नाम्र	मजल्यांची संख्या / रहिवाशांची संख्या नि.अनि.=एकूण	बांधकाम क्षेत्रफळ चौमी / दुरुस्ती दर प्र.चौ.मी.	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम	निव्वळ टप्प्याची रक्कम	रु.७५०/- प्र.चौ.मी. दराने मर्यादित रक्कम	रु.७५०/- प्र.चौ.मी. पेक्षा जादा आलेली रक्कम	शेरा
१.	२.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
१.	ई-१	"अ"	इ.क्र.१२ [८४] "डी" लिमा स्ट्रीट, माझगांव, मुंबई	दुसरा / मंडळ	तळ + १ / ३ + ० = ३	२७७.१४ / ८१७.९४	२६६६८६/-	१३००२४/-	१११९९३/-	१८८३१/-	मंजूर
२.	ई-१	"अ"	इ.क्र.६५ नबाब टँक रोड नसीर पॅलेस	चौथा [सुधारित] / मंडळ	तळ + ४ / ३५ + १६=५१	३१२४.०४ / ६२५.५६	११८५५३६/-	१४१६२६२/-	१४१६२६२/-	—	मंजूर
३.	ई-१	"अ"	इ.क्र.१-३ आधीबाग न्यु आझम बिल्डिंग	चौथा [सुधारित] / मंडळ	तळ + ५[अंशतः] / ५८ + १=५९	११९३.२५ / ७७९.८२	१५५४३१०/-	४६११६४/-	४३०५१२/-	५१४५२/-	या.वाग ची फी १० टक्के ऐवजी ६० टक्के आणि सुधारणा करण्याच्या अटीत अधिन राहून मंजूर.

२०१०८५०

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	शेरा
४.	क.ग.[ड]	"अ"	खिमजी नागजी चाळ नं. १ सेनापती बापट मार्ग	ति.टप्पा / मंडळ	तळ + २ / ७५+१६=९१	१६५९.०९ / ६७३.९९	१०६८७४९.०० / ७०५३३५.००	७०५३३५.००	—	मंजूर
५.	—"—	"ब"	इ.क्र. २९ राकाजी मळा आचार्य दोंदे मार्ग	प.टप्पा / मंडळ	तळ + ३ / २०+६=२६	१०६५.०० / ५३२.६६	५६७२९१.०० / ५६७२९१.००	५६७२९१.००	—	मंजूर
६.	—"—	"क"	इ.क्र. ३७३-अे श्री. साई प्रसाद मुरारी घाग मार्ग	प.टप्पा / मंडळ	तळ+२+ति. अशात / २०+०=२०	५४४.३६ / ७१३.७७	३८८५५३.०० / ३८८५५३.००	३८८५५३.००	—	मंजूर
७.	—"—	"अ"	इ.क्र. ११५ अब्दुल रज्जाक बिल्डिंग बेरबाई पाडीया रोड	ति.टप्पा / मंडळ	तळ + ४ / ४४+०=४४	१२०६.३८ / ५६६.९८	६८४०००.०० / ४२८९५९.००	४२८९५९.००	—	मंजूर
८.	—"—	"अ"	इ.क्र. ४० लगड बिल्डिंग गोखले सोनापटी लेन	चौ.टप्पा / मंडळ	तळ +३ / ४८+०=४८	११२०.०० / ७२१.४१	८०७९८२.०० / ६३४०८२.००	६३४०८२.००	—	मंजूर
९.	—"—	"अ"	इ.क्र. ५ ऋषीकेश भवन आई भाई मेरवानजी रोड	ति.टप्पा / मंडळ	तळ+४ / ६२+२=६४	१३३४.५० / ६६२.२३	[illegible] / ६२३६५८.००	८८३७४८.०० / ६२३६५८.००	—	मंजूर
१०.	—"—	"अ"	इ.क्र. १ व २ मानकेश्वर बिल्डिंग डॉ. आंबेडकर रोड	ति.टप्पा / मंडळ	तळ + १ / १३+१३=२६	६२९.०८ / ७२०.७५	५४३४१५.०० / १९१७४९.००	१९१७४९.००	—	मंजूर

5556) नं

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.	१०.	११.
११.	फा [ड]	"क"	क्र.क्र.१४४ डॉ.साने गुरुजी मार्ग	दु.टप्पा / मंडळ	तळ + २ / १८+७=२५	५०३.७४ / ७८८.१०	३९७००२.०० / ३५०११०.००	३३०९९३.००	१११९७.००	मंजूर
१२.	-"-	"अ"	क.क्र.९८ हाजी कासम चाळ शारीर अमर रोड मार्ग	ति.टप्पा / मंडळ	तळ + १ / १९+५=२४	२०१०.८७ / ६८३.१७	६९०५९८.०० / २७६३०५.००	२७६३०५.००	—	मंजूर
१३.	-"-	"अ"	न.क्र.२५४-अ कमल निवास	ति.टप्पा / मंडळ	तळ + ४ / ३५+०=३५	८८४.८८ / ३८३.७९	३३९६११.०० / २२७००२.००	२२७००२.००	—	मंजूर
१४.	-"-	"अ"	न.क्र.१-७ श्यामभुवन डॉ.आंबेडकर रोड	चा.टप्पा / मंडळ	तळ + ४ / ५८+१५=७३	३५८६.०८ / ७२६.६३	२६०५७६५.०० / ९६१६६५.००	९६१६६५.००	—	मंजूर
१५.	-"-	"अ"	न.क्र.९३ अे ओक्स टेरेस डॉ.एस.एस. रोड	चौ.टप्पा / मंडळ	तळ + ४ / ९४+१४=१०८	४०४१.०० / ६८५.००	३७३६३५२.०० / १५५२६९१.००	१५५२६९१.००	—	मंजूर
१६.	-"-	"अ"	न.क्र.२८०-बी जयजकार मॅन्शन डॉ.बी.अे.रोड	प.टप्पा / मंडळ	तळ मजला / ६+०=६	१५३.८१ / ११८९.९८	१८३०३१.०० / १८३०३१.००	११५३५७.५०	६७६७३.५०	संपूर्ण दुरुस्ती उपकर उत्पन्नाच्या अधिन राहून मंजूर.
१७.	-"-	"अ"	न.क्र.२८०-बी जयजकार मॅन्शन डॉ.बी.अे.रोड	प.टप्पा / मंडळ	तळ मजला / ६+०=६	६८.८० / १००६.०३	६९२२५.०० / ६९२२५.००	५१६००.०० / ८०५५१४०.५०	१७६२५.०० / १००४८५.००	वरील प्रमाणे
१८.	फा-[उ]	"ब"	१९ एफ बाळकृष्ण सदन गोखले रोड [उ] दादर	दु.टप्पा / मंडळ	तळ + ४ / २७+८=३५	१५४२.०० / ३६३.४२	५६०४०२.०० / ४४१९९५.००	४४१९९५.००	—	मंजूर

... ४ ...

९६।८।७१

२७.	फा [उ]	"क"	१२ प्लॉट क्र. १९६ गुरु तपन कुटीर, वडाळा,	प. टप्पा / मंडळ	तळ + २ / १७+६=२३	१०७४.९९ / ६०८.०४	६५२६४०/– / ६५३६४०/–	६५३६४०/–	–	मंजूर
२८.	–"–	"ब"व"क"	१६३ डी. उशीका निवास, डॉ. चि. स. रोड, दादर	दु. टप्पा / मंडळ	तळ + २ / १६+०=१६	७४३.६२ / ७००.८५	५२३२७२/– / ४४७५७६/–	४४७५७६/–	–	मंजूर
२९.	–"–	"अ"	न.भू. क्र. २७०–२७२ अे, लक्ष्मी भवन, एस. सी. केळकर रोड, दादर.	दु. टप्पा / नागरी	तळ + ३ / ३०+१२=४२	१४०३.९७ / ६५४.३५	९१८६८१.०० / ७३३७७४.००	७३३७७४.००	–	मंजूर

15349680/

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
८]	३७-४५ रघुनाथ महाराज स्ट्रिट..	तिसरा[हु] मंडळ.	तळ +- ४ / ३१+-११=४२	१४०४.३४	४७२१३७/-	७००००/-	---	मंजूर.
९]	५६-५६-ए, ५८ झकेरिया मस्जिद स्ट्रिट.	तिसरा मंडळ.	तळ +- ४ / ४७+-१=४८	१२५५.२० / ७४६.७२	९३७२९५/- / ३३३४६०/-	३३३४६०/-	---	मंजूर.
१०]	२००-२०२ विशाणवाडा रोड.	दुसरा	तळ +- ४	३९२.५९	३६५५२८/- / १५१६२७/-	७९९४१/-	७१०८६/-	मंजूर.
११]	"सी-१/२ विभाग" ६/१६ तिसरा भोईवाडा.	दुसरा मंडळ.	तळ +- ४ / ४+-७=११	४८५.७५ / ७३६.३३	३५७६७३/- / २३९४५८/-	२३९४५८/-	---	मंजूर.
१२]	७४ सैफिज्युबिली स्ट्रिट.	दुसरा मंडळ.	तळ +- ३ / ७+-१= ८	२६१.४८ / ८२४.७१	२१५६४६/- / १४०६४६/-	१२१११०/-	१९५३६/-	मंजूर.
१३]	१२७ किका स्ट्रिट..	दुसरा[नंदीन] मंडळ.	तळ +- ३ / ३+-१=४	२२७.०० / ६३९.०३	१४५०६०/- / ११५०६०/-	११५०६०/-	---	मंजूर.
१४]	५११-५१३ मौलाना आझाद रोड.	पहिला मंडळ.	तळ +- १ / १०+-३=१३	२६७.०० / ९४२.५५	२५१६६१/- / २५१६६१/-	२००२५०/-	५१४११/-	मंजूर.
१५]	१६-१८ शामशेट स्ट्रिट.	दुसरा. मंडळ.	तळ +- ४ / ६५-२=८	४८३.३० / ६९४.१४	३३५४७०/- / ३००४८०/-	३००४८०/-	---	मंजूर.
१६]	४२ पहिली कारपेंटर स्ट्रिट.	तिसरा मंडळ.	तळ+-२+-३[अंशत:] / १३+-१४=२७	५७७.३७ / ७९३.६९	४५८२५४/- / २८५०४३/-	२५२८१६/-	२५२२७/-	मंजूर.
१७]	१३२ एफ, भुलेश्वर रोड भगतवाडी.	तिसरा. मंडळ	तळ +- ३ / ३३+-२९=६२	१४४६.०० / ६९०.७२	९९८७६३/- / ३४०२५६/-	९९८७८३/-	---	मंजूर.

5020196/ ३/-

१.	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
१८]	९८-१०६ निझाम स्ट्रिट.	चौथा. / मंडळ.	तळ + ५ / ५२+-५=५७.	१३७५.८० / ८९३.६६	११२१४९८/– / ५४२८२५/–	३४५१७७/–	१९७६४८/–	अधिक रक्कम ५०% भरण्याच्या अटीस अधिन राहुन मंजूर.
१९]	४२ ईस्लामपुरा स्ट्रिट.	दुसरा. / मंडळ.	तळ + १ / ३१+-३=३४	४०८.०५ / ११६०.०२	४७३३४८/– / ३५०९३७/–	१८७६९८/–	१६७३११/–	मंजूर.
	डी-३/४.							
२०]	३२२ डी, जे.एस.एस. रोड.	तिसरा. / मंडळ.	तळ + २ / २४+-०=२४	६८७.७५ / ७२०.६६	४९५६३३/– / २६५०००/–	२६५०००/–	—	मंजूर.
२१]	३४-एस बी, हनुमान लेन.	पहिला. / मंडळ.	तळ + ३ / ७+-८=१५	३४१.०० / १४३५.३२	४८९४४५/– / ४८९४४५/–	२५५७५०/–	२३३६९५/–	मंजूर.
२२]	३३० जे.एस.एस. रोड.	चौथा. / मंडळ.	तळ + ४ / १८+-५=२३	९७९.०० / ७०६.१७	६९१३४४/– / २४२६४८/–	२४२६४८/–	—	मंजूर.
	डी-१ विभाग.							
२३]	१२ दुभाष लेन, पहिली गल्ली.	तिसरा / मंडळ.	तळ+-१+-भाग-२ / ३ + ० =३	२५७.०० / १०४०.०५	२६७२९४/– / २०७२९४/–	१३२७५०/–	७४५४४/–	मंजूर.
२४]	४७-४९-५१, व्ही.पी. रोड.	पहिला. / मंडळ.	तळ + ४ / १२ +-१=१३	११२६.३९ / ७६६१.१०	९१२४४८/– / ९१३४४८/=	८८९७९२/–	२२६५६/–	मंजूर.
२५]	९ बाणगंगा रोड.	चौथा. / मंडळ.	तळ + ४ / ११+-१=१२	३५४.०० / ७२५.८७	२७१४७७/– / १३०८७७/–	१३०८७७/–	—	मंजूर.
२६]	१५३ ऑगस्ट क्रांती मार्ग.	पहिला. / मंडळ.	तळ + ४ / ५+-३=८.	११४२.८० / ६४६.७६	७३९१२३/– / ७३९१२३/–	७३९१२३/–	—	मंजूर.
२७]	१३९सी, ऑगस्ट क्रांती मार्ग.	तिसरा. / मंडळ.	तळ + २ / ९+-४=१३	१६८६.०० / ५९२.३१	९९८६३९/– / ३७७४०४/–	३७७४०४/–	—	मंजूर.
२८]	४ अे खाडीलकर रोड.	दुसरा. / मंडळ	तळ + ३ / ११+-२=१३	६२५.६१ / ७१०.२९	४४४३३२/– / १९३२३१/–	१९३२३१/–	—	मंजूर.

....४/–

१४७७४२८

	२.	३.	४.	५.	६.	७.	८.	९.
२९]	१५, जे.एस.एस. रोड.	तिसरा. मंडळ.	तळ + ३ / ६+–०=६.	४७०.५२ / ६२७.४४	२९५२२३/– / २४२१८२/–	२४२१८२/–	——	मंजूर.
३०]	९–एसी, व ११–११ डी, मंगलवाडी.	तिसरा[सुधा] मंडळ.	तळ + ४ / ६४+–७=७१	३१४३.७५ / ५९८.२४	१८८०१३३/– / १५२५१५५/–	५२७०००/–	——	मंजूर.
३१]	४३ खत्तर अली लेन.	पहिला. मंडळ.	तळ + १ / ४ +–१=५	१२७.४० / १७७०.४४	२२५४५५/– / २२५५५५/–	९५५५०/–	१३०००५/–	मंजूर.
३२]	४७९–सी, एस. व्ही.पी. रोड.	पहिला. म्हाडा	तळ + ३ / २+–३=५.	८२१.०८ / ५२०.६६	४२७५०६/– / ४२७५०६/–	४२७५०६/–	——	मंजूर.
३३]	२४२ वाळकेश्वर रोड.	तिसरा मंडळ.	तळ + २ / ८+–०=८	६९२.४८ / ७४७.३५	५१७५२२/– / २७८९४३/–	२७८९४३/–	——	मंजूर.
३४]	६८ खत्तर अली लेन.	पहिला मंडळ.	तळ + १ / २+–१=३	१३५.९१ / ७०९.५४	९६४३३/– / ९६४३३/–	९६४३३/–	——	मंजूर.
	"डी–२ विभाग".							
३५]	१८–१८ अे, अरब लेन. [तांबावाला बिल्डिंग].	तिसरा मंडळ.	तळ + ३ / ४९+–२=५१	११५०.०० / ११०७.४०	१२७३५०६/– / ६९८५०६/–	२८७५००/–	४११००६/–	मंजूर.
३६]	१६७एक खेतवाडी मेन रोड [आर ब्लॉक, सिक्कानगर].	पहिला म्हाडा.	तळ + ३ / ३५+–१=३६	१८५१.७५ / ४४८.२२	८२९९९४/– / ८२९९९४/–	८२९९९४/–	——	मंजूर.
३७]	७४–सी, गोपाळराव देशमुख [पेडर रोड]	दुसरा. मंडळ	तळ + १ / १६+–१२=२८	५४७.८६ / ७०९.९०	३८८९२४/– / ३८६३४८/–	२८६३४८/–	——	मंजूर.
३८]	८३–८७ खेतवाडी बॅक रोड [१ खेतवाडी सातवी गल्ली]	तिसरा मंडळ.	तळ + ३ / ९+–९=१८	७२३.९६ / १७.११	५११९५८/– / ३२४३५२/–	३२४३५२/–	——	मंजूर.

144|2402